# ISBN PAPER AND BOOKS

# 2017 - 18

Scanned with OKEN Scanner

# भाषा, समाज और समकालीन साहित्य

(Bhasha, Samaj Aur Samkalin Sahitya)


**संपादक**

डॉ. दत्ता साकोले

डॉ. मुकुन्द गायकवाड



आदित्य प्रकाशन

राजगड ऑफिस, खर्डेकर स्टॉप

औसा रोड, लातूर



Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

1

ISBN 978-93-5268-073-3

Internal Quality Assurance Cell
Indira Mahavidyalaya, Kalamb
Sant Gadge Baba Amravati University,
Marathi Pradhyapak Parishad
& Dr. Bhau Mandavkar Research Center
Sponsored State Level Seminar On

# FACING TO NAAC

Saturday, 25 Feb. 2017
**SEMINAR PROCEEDINGS**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
डॉ. य.मो. दोंदे सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट, कळंब द्वारा संचालित
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
इंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेल
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
व डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

विभागीय चर्चासत्र

# नॅकला सामोरे जाताना

शनिवार दि. २५.०२.२०१७
**स्मरणिका**

मुख्य संपादक व प्रकाशक
डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

Scanned with OKEN Scanner

# नॅक मूल्यांकनात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका

प्रा. सूर्यवंशी दीपक सुभाषराव
मराठी विभाग, रासेयो गटसमन्वयक
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद
इमेल – deepaks2021@gmail.com मो. ९४२०९५८६९९

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून व्यक्ती, समाज व शिक्षण या त्रिकोणामध्ये शिक्षणाला अन्यन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. दर्जेदार शिक्षण देणा–या संस्था व महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणानुसार आपले उपक्रम राबवावे लागतात. १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील गुणवत्ता दर्जा कायम असावा यासाठी स्वतंत्रपणे नॅक–राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद स्थापन करून बदलत्या जागतिक शैक्षणिक धारेणानुसार शिक्षण संस्थांनी सुधारणा करण्यासाठी ही समिती अमंलबजावणी व नियमन करते. प्रस्तूत समितीव्दारे मूल्यांकन करून ग्रामीण शहरी, अविकसीत व विकसीत तसेच आदिवासी भागातील संस्थांना या प्रवाहात आणण्यासाठी, गुणवत्ता वाढीसाठी कार्यरत असते.

नॅक समितीच्या वतीने संस्थेला व महाविद्यालयाला एकूण ७ कसोटया सुचविल्या आहेत. अभ्यासक्रमाची उपलब्धता, लवचिकता, विषयाशी संबंधीत उपक्रम राबविणे, अध्ययन, अध्यापनास प्राधान्य देणे, संशोधनास प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा देणे, विद्यार्थ्यांना परीक्षार्थी न बनवता ज्ञानार्थी बनवणे. परिणामी मूल्यांकनात शैक्षणिक व घटक नियोजन करणे, योग्यती अमंलबजावणी करणे, नोंदवही, अध्यायावत अध्यापन पध्दती, वाचन व लेखन यासाठी कार्यशाळा घेणे, व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करणे आणि मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य करणे, तसेच संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थापन उत्कृष्ठरित्या राबवणे या बाबीवर मूल्यांकनांत महत्व दिले जाते.

## उद्दिष्टे

आजचा विद्यार्थी उदयाचा नागरिक आधार स्तंभ असल्याने गुणवत्ता वातावरण निर्मिती करणे, रोजगार, स्वयं रोजगार तसेच संशोधनाला गती देणे. खाजगी व सामाजिक संस्थांना स्वयंपूर्ण करणे, सरकारचा खर्च अधिभार कमी करणे, संस्थांना स्वयंमूल्यमापनासाठी प्रयुक्त करून कौशल्य आधारीत लोक कल्याणकारी धोरणाची स्थानिक, राष्ट्रीय व आतंराष्ट्रीय स्तरावरून जपणूक करणे.

## अभ्यासपूरक विभाग

महाविद्यालयामध्ये नियोजित अभ्यासक्रमाव्दारे विद्यार्थांना संस्कारीत केले जाते. परंतू याशिवाय असे अभ्यासपूरक विभाग असतात ज्यात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्र छात्र सेना, राष्ट्रीय हरित सेना, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, कमवा व शिका, विज्ञानमंच, सामाजिक शास्त्र मंडळ आणि वाङ्मय मंडळ यांचा समावेश होतो. विद्यार्थी केंद्रबिंदू असल्याने महाविद्यालय अनुषंगिक प्रसंगातून अपेक्षित वर्तन बदल करण्यासाठी प्रयत्न करतात. सामाजिक, मानसिक, भावणिक, भाषिक आणि बौध्दीक विकासासाठी सातत्याने उपक्रम राबविले जातात. तसेच नॅक–शिक्षण–महाविद्यालय–अभ्यासक्रम–विविध उपक्रम या संरचनेत प्रत्येक घटकाला महत्त्व आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना

अभ्यासक्रमाशिवाय विद्यार्थांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी चार भिंतीशिवाय बाहेरचे जग ज्ञात करून देणे गरजे आहे. तो केवळ पुस्तकी किडा न राहता प्राप्त परिस्थितीची जाणिव ठेवून प्रसंगावधान राखणारा असला पाहिजे. हे फक्त अभ्यासेत्तर कार्यक्रमातूनच होवू शकते. विद्यार्थी स्वावलंबी होतो, सभाधिट, नेतृत्वगुण संपन्न, सहकार्य भाव, श्रमप्रतिष्ठा अंगी बाळगणारा, चारित्र संपन्न तसेच लोकशाहीसाठी संवेदनशिल असणारा नागरिक निर्माण होतो.



25

Scanned with OKEN Scanner

## राष्ट्रीय सेवा योजनेची नॅकसाठी करावयाची पूर्वतयारी

नॅकला सामोरे जाताना महाविद्यालयातील सर्वच घटक एक जुटीने तळमळीने काम करतात. हे टिम वर्क असल्याने प्रत्येकाचे योगदान असल्याशिवाय गुणवत्ता सिध्द होत नाही. अभ्यासेत्तर विभागात राष्ट्रीय सेवा योजना महत्वाचा घटक असून त्याचे सूक्ष्म नियोजन खालील प्रमाणे करावे.

१. विभागातील स्वंयसेवकांची नाव नोंदणी रजिस्टर अद्ययावत असावे.

२. दैनदिंन पत्रव्यवहार, आवकजावक रजिस्टर व बैठक रजिस्टर असावे.

३. खरेदी–विक्री, लेखापरिक्षण इ. नोंदी असाव्यात. तसेच ठराव रजिस्टर तारिखनिहाय असावे.

४. विभागतील स्वंयसेवकांचा शिबीर सहभाग असलेल्या नोंदी असाव्यात.

५. सलग पाच वर्षे ज्या ज्या गावामध्ये निवासी शिबीर घेतले, जे उपक्रम राबवले त्याच्या नोंदी असलेले अहवाल पत्रक असावे.

६. विभागामार्फत जे भरीव कार्य केले आहे राष्टीय, राज्य, स्थानिक शिबीर स्वंयसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या सहभागाची माहिती असावी.

७. डेड स्टॉक रजिस्टर, साहित्य खरेदी नोंदवही, साहित्य देवाण घेवाण रजिस्टर व प्रमाणपत्र वितरण नोंदवही असावी.

८. वर्तपत्रातील बातमीची कात्रण फाईल, छायाचित्र, प्रमाणपत्र इत्यादीचे वर्ष निहाय रेकॉर्ड असावे.

९. नॅक समिती प्रत्यक्ष त्या शिबीराच्या गावी जावून ग्रामस्थांच्या भेटी घेतात, त्याकरीता ग्रामस्थांसी सुसंवाद असावा कारण त्याचा अभिप्राय महत्वाचा असतो.

१०. वर्षभर आयोजित केलेल्या महापुरूषांची जयंती, पुण्यतिथी, विद्यापीठाला केलेला पत्र व्यवहार इत्यादीचा अहवाल वर्ष निहाय असावा.

११. राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग नॅकमध्ये महाविद्यालयाला जास्तीत–जास्त श्रेयांक मिळवूंन देणारा विभाग आहे. रचनात्मक कार्य केल्याचा अहवाल वेळोवेळी संकलित करावा.

### संदर्भ

प्रा. ब्रिजमोहन दायमा, नॅकला सामोरे जाताना, विद्याभारती प्रकाशन, लातूर, आवृत्ती २००३

❖❖❖



26

Scanned with OKEN Scanner



**विद्यापीठ अनुदान आयोग**
**आणि**
**शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,

## दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

२७ व २८ जानेवारी २०१७

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

# स्मरणिका




मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

संपादक
डॉ. दादाराव गुंडरे

सहसंपादक
प्रा. दीपक सूर्यवंशी
डॉ. केदार काळवणे


Scanned with OKEN Scanner

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

प्रथम आवृत्ती : जानेवारी २०१७

**प्रकाशक :**
आदित्य प्रकाशन,
लातूर

**मार्गदर्शक :**
प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

**संपादक :**
प्रा. डॉ. दादाराव गुंडरे

**सहसंपादक :**
प्रा. दीपक सूर्यवंशी
डॉ. केदार काळवणे

**अक्षरजुळणी :**
श्री गणेश सातपुते
कळंब (मो. ९७६६८५३२३७)

**किंमत :**
२००/-

ISBN : ९७८-९३-८३९०९-२६-५

*या स्मरणिकेत प्रकाशित झालेले लेख संबंधीत लेखकांचे असून त्यासाठी संपादक, सहसंपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

Scanned with OKEN Scanner

## चरित्र, आत्मचरित्र व समीक्षा आविष्करण


३५. आठवणींचे पक्षी तील संयमीपणा — २२८
*प्रा. डॉ. पद्माकर पिटले*

३६. उत्तम कांबळे यांचे ललित लेखन : एक आकलन — २३६
*प्रा. पसरकल्ले समाधान पंडू*

३७. मी वनवासी आत्मचरित्रातील स्त्री जीवनसंघर्ष — २४०
*प्रा. डॉ. सुरेखा बनकर-बादाडे*

३८. संघर्षशील जीवनाची प्रेरणादायी गाथा : सीमा लढ्याचे नायक भाई बापूसाहेब एकंबेकर — २४९
*भरतकुमार शिवाजीराव गायकवाड*

३९. समकालीन आदिबंधात्मक समीक्षा पद्धती — २५३
*डॉ. एम. ए. कव्हळे*


## भाषा व माध्यमांचे आविष्करण


४०. प्रसार माध्यमातील मराठीचे स्वरूप — २६१
*प्रा. डॉ. तुषार चांदवडकर*

४१. मराठी नाटकांची सद्यस्थिती — २६८
*सौदागर हनुमंत बिरूदेव*

४२. चित्रपट माध्यमाचे स्वरूप व भाषा — २७६
*प्रा. डॉ. प्रशांत चौधरी*

४३. यादवकालीन भाषेचा समकालीन वाङ्मयावर झालेला प्रभाव — २८२
*प्रा. डॉ. आर. बी. धायगुडे*

४४. ग्रामीण जीवन आणि भाषाविष्काराच्या दृष्टीने 'बिरडं'चे वेगळेपण — २८७
*डॉ. दादाराव गुंडरे*




Scanned with OKEN Scanner

# ग्रामीण जीवन आणि भाषाविष्काराच्या दृष्टीने 'बिरडं'चे वेगळेपण

डॉ. दादाराव गुंडरे
मराठी विभागप्रमुख
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

मराठी कथेचा इतिहास पाहता १९६० नंतर मराठी साहित्यात अभूतपूर्व वाह आले. त्यामध्ये ग्रामीण साहित्याचा समावेश होतो. कारण रंजकतेतून मुक्तता मिळवत खेड्यापाड्यातील सामाजिक वास्तव मराठी ग्रामीण साहित्यातून प्रतिबिंबीत होऊ लागले. आपली जीवन विषयक नवी दृष्टी ग्रामीण लेखकांनी कथेतून मांडण्याचे काम केले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात अंतर्मुख होवून आपला परिसर, समाज, संस्कृतीला अक्षररूप देणारे, वास्तव्यातल्या पर्यावरणाला, जाणीवांना साकारणारे, ग्रामीण जीवनातील भोग, व्यथा, वेदना व लहानसहान कळा ज्यांनी ग्रामीण कथा साहित्यातून प्रकट केल्या. ते मराठवाड्यातील अग्रगण्य कथालेखक भास्कर चंदनशिव आहेत. तिसऱ्या पिढीतील ग्रामीण लेखकांच्या नामावलीत ज्यांच्या अग्रक्रमाने व आवर्जुन उल्लेख डॉ. आनंद यादवांनी केला. ते नाव म्हणजे ज्येष्ठ ग्रामीण कथालेखक भास्कर चंदनशिव होय. १९७० नंतर मराठी कथाकारांची जी पिढी उदयास आली, स्वातंत्र्योत्तर काळातील बदलेल्या खेड्यांचा वेध घेत कृषी जीवनाशी एकनिष्ठता सांभाळून ग्रामीण माणसांच्या भावभावनांना अस्सल मराठवाडी, ग्रामीण बोलीतून शब्दांचा हुंकार देणारे सकस कथालेखक म्हणून चंदनशिवांना ओळखले जाते. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी मराठवाड्यात जी कथालेखकांची पिढी उदयास आली

त्यामध्ये ग. रं. बोरसडे, मुकुंद कृष्णा गायकवाड, बंकट पाटील, सुखराम हिवराळे, योगीराज वाघमारे, वासुदेव मुलाटे, सोपान हाळमकर, किशोर घोरपडे, जगदीश कदम, नागनाथ कोत्तापल्ले, महावीर जोंधळे यांसारख्या कथालेखकांचा समावेश होतो.

लेखक ज्या परिसरात आणि वातावरणात राहतो त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून उमटत असते. भास्कर चंदनशिव यांची जन्मभूमी व कर्मभूमी ही मराठवाड्यासारखा अविकसित, निजामकालीन अंकुश असलेला प्रदेश असल्याने तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील 'स्थित्यंतरातून आघाडीचे कथालेखक म्हणून पुढे आले. ग्रामीण समाजात होत असलेल्या संक्रमणाची स्पष्ट जाणीव, ग्रामीण जीवनातील समस्येचा वेध, कृषीसंस्कृतीचा परीघ मराठवाड्यातील ग्रामीण बोलीभाषेचा वापर करून कथालेखन केले. ज्यामध्ये 'जांभळढव्ह', 'मरणकळा', 'अंगारमाती', 'नवी वारूळं' व 'बिरडं' या कथासंग्रहाचा समावेश होतो. यापैकी 'बिरडं' हा त्यांचा कथासंग्रह १९९९ साली प्रकाशित झाला. ज्यात एकूण १५ कथा आहेत. या संग्रहातील कथा ज्या काळात फुलत गेल्या तो काळ सत्तरीच्या दशकातला आहे. ग्रामीण जीवनाचा वेध घेणाऱ्या या कथेत खेड्यापाड्यातील लोकांचे होणारे हाल, पडणारे कष्ट, असहायता यांचा समावेश आहे. एकीकडे नेमकेच निजामी राजवटीच्या अन्याय अत्याचाराला कंटाळलेला मराठवाडा नवी स्वप्ने पाहत होता तर दुसरीकडे अज्ञान, रूढी-परंपरा माणसाला चिकटून होत्या. अशा परिस्थितीत सर्वसामान्य शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, हाल, अपेष्टा, पोटाची आग विझवण्यासाठी सर्वस्व गमवावे लागलेल्या व्यक्ती, पोटासाठी शहराकडे धाव घेणाऱ्या व्यक्ती, अज्ञानामुळे नव्या राजकारणाच्या गळचेपीमुळे सर्वसामान्यांचे जे हाल होत होते या सर्व दुःखितांचा शोध भास्कर चंदनशिव यांनी खास मराठवाडी बोलीभाषेतून 'बिरडं' कथासंग्रहाद्वारे घेतला आहे. ज्यामुळे मराठवाड्याचा मातीचा सुगंध तर दरवळलाच पण त्याला जोडून कथासाहित्यास समृद्धी व बळ प्राप्त झाले. एक



Scanned with OKEN Scanner

कस कथालेखक म्हणून भास्कर चंदनशिव यांचे नाव पुढे येते. हेच सांगण्याचा
यत्न या शोधनिबंधातून केला आहे.

ग्रामीण भागात शेतीप्रधान समाज असल्याने त्यांची सुखदुःखे त्या
तीशी निगडीत असतात. भास्कर चंदनशिव यांच्या ग्रामीण कथेस
राठवाड्याची पार्श्वभूमी असल्याने त्यांच्या साहित्यातून दुष्काळाचे व त्यामुळे
र्माण झालेल्या भुकेचे, अस्वस्थतेचे चित्रण येते. गावपरिसरातील शेतकरी वर्ग,
सर्गिक व मानवनिर्मित संकटे, त्याचा शेतकरी व सामान्य माणसावर होणारा
रिणाम याबद्दलची अस्वस्थता कथारूपाने कवेत घेतली. 'बिरडं' मधून त्यांनी
ास्तवदर्शी पद्धतीने दुष्काळ व भूकेची मांडणी केली आहे. या कथासंग्रहातील
हिली कथा 'कळा' तसेच 'पोटांधळ', 'सुक्याची आगटी', 'मुकी हालकी',
'वासना' यासारख्या कथा याचे दर्शन घडवतात.

'बिरडं' मधील पहिली कथा 'कळा' ही मराठवाड्यात पडलेल्या
१९७२ च्या भीषण दुष्काळाची जाणीव करून देते. या वास्तवाचे चित्रण करताना
ास्कर चंदनशिव लिहितात, "सारं गाव ओस, शांत व्हतं. उन्ह वाढत व्हती.
आन् साऱ्या अंगानं आभाळ पेटलं व्हतं. उभ्या माळरानातल्या नागड्या झळाया
घिरटत घिरटत गावात शिरत व्हत्या. उघडी-बोडकी घरं चितमनानं भाजत-
करपत उभी व्हती. त्यांच्या अंगा-खांद्यावरून फिरणारं गरम वारं उरल्या-
सुरल्याचा ठावठिकाणा हुडकीत पळत व्हतं. सारं रस्त आन् गल्ली-बोळ्या
रिकाम्या पडल्या व्हत्या. दारा-घराला कड्या-कुलपं लावून माणसं पाय न्हेतील
तिकडं, पोट हाती घेऊन भाकरीचा माग हुडकीत हिंडत व्हती. इशीपुढचा पिंपळ
गंतपित्यागत झडून गेला व्हता. थोटकं हात आभाळात पसरून उभा व्हता.
त्याच्या अंगा-खांद्यावर बसलेली गिधाडं, मरत्याचा वास हुंगीत घिरटत व्हती.
फडफडत घश्यातल्या घश्यात चिर्रकत कालवा करीत पळत व्हती. सारा पार
चुना सांडल्यागत ढवळा-काळपट झाला होता."[१] अशा शब्दातून दुष्काळाचा
प्रभाव इतका मोठा असल्याचे दाखवून देतात. ज्याच्या कळा या असह्य अशाच
होत्या. मराठवाड्यातील गावेच्या गावे भकास झाली होती. ग्रामीण भागातील

सामान्य माणसांची पाऊली शहराकडे धाव घेत होती. गावाचे गावपण हरवले होते. गावच्या श्रीमंत पाटलापासून ते सामान्य लोकापर्यंत सर्वजन भाकरीच्या तुकड्यासाठी तळमळत होते. तसेच काही पोटासाठी वाईट मार्गाकडे वळले होते. या गावचा 'बाज्या' आपल्या संपूर्ण कुटूंबासह मुंबईला जायला निघतो, सिरिमंत पाटलाचा मुलगा 'गोपाळ' सुद्धा निघतो. एकेकाळी वैभवात लोळण घेतलेल्या व गावाचे वैभवपण जपलेल्या सिरिमंत पाटलासही दुष्काळाचे चटके सहन होत नाहीत. हे सर्व जीवन अनुभवताना प्रत्येकास होणाऱ्या कळा असह्य अशाच स्वरूपाच्या असल्याचे भेदक चित्रण, करूणामय चित्रण कथालेखक करतात.

दारिद्र्य व उपासमारीमुळे ग्रामीण समाजजीवनात पोटाच्या भुकेसाठी आपले सर्वस्व गमावण्याची वेळ येते. याचा प्रत्यय त्यांच्या कथेतून येतो. 'वासना' कथेतून चित्रीत केलेली भागा म्हारीण व तिची मुलगी पुतळा याचे प्रतिनिधीत्व करतात. भुकेच्या पायी फक्त आंधळ होऊन पाहणं नशिबी आहे. यांचा अनुभव त्यांची 'पोटांधळ' ही कथा देते. या कथेतील म्हतारा, त्याची बायको व मुलगी चंपा याचे प्रतिनिधीत्व करतात. 'मुकी हालकी' या कथेतील शेषाच्या माध्यमातून भुकेची तीव्रता लक्षात आणून देतात. तसेच 'सुक्याची आगटी' या कथेतील सुक्याचे संवाद या भुकेची तीव्रता स्पष्ट करून जातात. या भूकेच्या तीव्रतेचा गैरफायदा घेणाऱ्या विकृतीवरही कथालेखक बोट ठेवतात. ग्रामीण समाज जीवनातील दुःख, दारिद्र्यावर प्रकाश टाकतात.

'बिरडं' मधून शेतकऱ्यांच्या दयनिय अवस्थेचे चित्रण केले आहे. सातत्याने निसर्गनिर्मित संकटाबरोबर मानवनिर्मित संकटात सापडल्याने अज्ञान व असहाय्यतेमुळे त्यांच्याभोवती प्रश्नांचा गुंता वाढत जातो. विदारक, विपन्न व दयनीय स्थितीला पोहचल्याची प्रखर जाणीव त्यांची कथा करून देते. ही जाणीव त्यांच्या 'होळी', 'बिरडं', 'बलामत' यासारख्या कथेतून होते. 'होळी' कथेतील गणा जाधव, 'बिरडं' मधील गणाभाऊ तर 'बलामत' मधील किसना शेतकऱ्यांच्या दयनिय स्थितीचा आलेख उजागर करतात. शेतकऱ्यांचे जिणे हे परावलंबी आहे, त्याच्या हाती कष्ट, घाम गाळणे आहे. नानातऱ्हानी त्याच्या



Scanned with OKEN Scanner

चाललेल्या शोषणाचे खोल दु:ख भास्कर चंदनशिव चित्रीत करतात. जे समस्त शेतकरी वर्गाचे दु:ख आहे.

बदलते ग्रामीण सामाजिक जीवन चित्रीत करताना ग्रामीण जीवनमूल्यांचा ऱ्हास होत असल्याचे दाखवून दिले आहे. १९६० नंतर थोड्या प्रमाणात व १९७० नंतर मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला. त्यातून शिक्षितांची एक नवी पिढी निर्माण झाली. त्यातील बऱ्याच जणांनी नोकरी, उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने शहराकडे स्थलांतर केले. पण गावाशी असलेली नाळ कायम ठेवणे त्यांना जमले नाही. आपण, आपली पत्नी, मुले एवढेच मर्यादीत त्यांचे विश्व झाले. प्रत्यक्ष जन्मदाते आई-वडिल, नातलग खोल गर्तेत ढकलले जाऊ लागले. याची नोंद त्यांच्या कथेने घेतली. ज्यामध्ये 'होरपळ' मधून स्वत:च्या मुलाने शेतात दुर नेऊन टाकल्याने अत्यंत दयनिय स्थितीस पोहोचलेला संतुनाना, 'राखण' कथेतील 'किसना', 'काळइळा' द्वारे आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी खस्ता खाणाऱ्या आई-वडिलांच्या स्वप्नांचा कसा चुराडा होतो, स्वप्नावर काळरूपी इळ्याचा कसा मोठा आघात होतो याचे चित्रण केले आहे. तसेच 'चक्कर कथेतूनही बदलत्या ग्रामीण समाजजीवनाचा मोठा आशय व्यक्त केला. यशवंताची बायको, हौसा, चहावाला सोपान्या, वाण्याचा ड़िगा, बामणाचा गंगाधर कल्याण ही पात्रेही बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवतात. शिकली सवरलेली मुले कशी वाईट नादी लागून लयास जातात याचे दर्शन घडवितात.

एकीकडे बदलत्या सामाजिक जीवनात आधुनिकतेमुळे नातेसंबंध तुटत चालले आहेत याचे दर्शन घडवितात तर दुसरीकडे काळ कितीही बदलला तरी मातीत रूजलेले संस्कार कधीही पुसले जात नाहीत याची प्रचिती 'उमाळा' कथेतून घडवितात. ग्रामीण संस्कृतीशी व तेथील मातीशी जी नाळ जोडली आहे ती कधीही न तुटणारी आहे हे दाखवून देणारे कथालेखन केले.

ग्रामीण जीवनानुभूतीचे प्रभावी दर्शन घडविण्यासाठी भाषेला अतिशय महत्वाचे स्थान असते. त्या-त्या प्रादेशिक संस्कृतीनुरूप भाषिक संस्कृतीचे लेखन



Scanned with OKEN Scanner

अपेक्षित असते. ज्यामुळे तेथील जीवन साकारण्यात लेखकास श्रेष्ठत्व लाभते. या दृष्टीने विचार केल्यास भास्कर चंदनशिव यांनी खास मराठवाडी वळणाची बोलीभाषा वापरून कथेबरोबर जीवनानुभवही समृद्ध, सक्षम केला. ग्रामीण कथेच्या भाषेबाबत डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''बोलीचा वापर हा जसा ग्रामीण लेखकांच्या लेखनातील अपरिहार्य असा भाग असतो त्याप्रमाणेच त्या-त्या लेखकाच्या शैलीचे विशेषही महत्वाचे असतात.''[२]

ग्रामीण माणसांच्या भावभावनांचे चित्रण करणारी कथा भाषेमुळे अर्थपूर्ण व गुणवत्तापूर्ण ठरते. मराठवाडी बोलीभाषेचा वापर करून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनास प्राधान्य देणारी भास्कर चंदनशिवांची कथा लक्षणीय ठरली. त्यांच्या 'बिरडं' कथासंग्रहातून ग्रामीण बोलीचे अनेक संदर्भ प्रकट झालेले दिसतात. कृषीजीवनाशी निगडीत बोली भाषेचा वापर कथेतून केल्याचे दिसते.

उदा. : १) ''गाव शिवारातल्या पाण्याच्या हिरी-बारवा आन् नद्या, तळी वाळवण घालावं तस्या वाळून, भेगाळून पडल्या व्हत्या. गुरं-ढोरं सोडून दिली व्हती. कायी पाणी-पाणी करून आचरू-इचरू घेत मरून गेली व्हती. दुभत्या खानवट्याच्या गाई दारात आनुन भरल्या मनानं आन् गळत्या डोळ्यानं हाळदी कुंकू लावून पुजल्या होत्या.'' (कळा)[३]

२) ''आन् किस्नाला पायच उचलाना झाला. हातातोंडाला आल्यालं ह्यो पीक, एक एक कणीस नारळाएवढं... वाऱ्याच्या झुळकीनं सारी ताटं लवंडत व्हती.'' (राखण)[४]

यासारखी कृषीजीवनाशी संबंधीत वर्णने व संवाद त्यांच्या कथेचे कृषीकेंद्रित स्वरूप लक्षात आणून देतात. खास वापरलेल्या भाषेमुळे मराठवाड्यातील ग्रामीण शेतकरी माणूस सर्वांगाने साकार होतो. कृषीसंबंधीत, ग्रामजीवनाशी निगडीत भाषा वापरल्याने त्यांची कथा प्रभावी, सामर्थ्यशाली बनली.



Scanned with OKEN Scanner

ज्या जीवनक्षेत्रातील अनुभव असतो त्याच जीवन क्षेत्रातील भाषा वापरणे आवश्यक असते. यादृष्टीने प्रा. नरहर कुरूंदकर यांनी "ग्रामीण कथेचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीवर निगडीत असतो"[५] असा व्यक्त केलेला विचार महत्वाचा वाटतो. काव्यात्मक भाषाशैलीचा वापर केल्यामुळे कथेला जिवंतपणा लाभला आहे. कथेतून वापरलेली भाषा प्राथमिक पातळीवरची नसून त्या लोकांच्या मनामनातील आहे. त्यात म्हणी, वाक्यप्रचार, उपमा, अलंकार यांची केलेली पेरणी जीवनानुभव वाचकासमोर जिवंत उभा करण्यात यशस्वी ठरली. अशा वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांनी युक्त भाषा वापराच्या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "नव्या जीवन जाणीवांच्या प्रकाशात ग्रामीण जीवनाचा अन्वयार्थ लावून ग्रामीण जीवनातील दुःख दारिद्र्याला परिणामकारकरित्या प्रकट करण्याचा प्रयत्न हे लेखक करीत आहेत. या संदर्भात भास्कर चंदनशिव यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. त्यांची भाषा प्रतिमांनी युक्त अशी असली तरी या प्रतिमा कथेच्या परिणामकारकतेला मारक ठरत नाहीत."[६] खरे तर भाषा आणि शैली हे वाङ्मयाचे परस्परपुरक आणि अविभाज्य असे घटक असतात. जे कलाकृतीस परिणामकारक करतात. स्वतः कथालेखक भास्कर चंदनशिव यांनी 'माझ्या कथा संपूर्ण ग्रामीण बोली भाषेच्या अर्थपूर्ण प्रतिमा-प्रतिकातून आलेल्या आहेत' असे स्पष्टपणे सांगीतले आहे. त्यामुळे त्यांच्या कथेला एक वैशिष्ट्यपूर्ण सामर्थ्य प्राप्त झालेले दिसते. या 'बिरडं' कथासंग्रहाविषयी प्रस्तावना लिहिताना फ. मु. शिंदे लिहितात, "भास्कर चंदनशिव हे समकालीन मराठी कथा साहित्यातलं बिन्नीचं अग्रणी नाव आहे. मराठी वाङ्मयातील नव्या जाणीवांच्या आधुनिक प्रवाहाला प्रगल्भ आणि प्रतिष्ठित करणारं त्यांचं कथासाहित्य प्रदेशाच्या, भाषेच्या, जातीपातीच्या सीमा पार करून निखळ जिवांच्या जवळिकतेचे जलाशय जतन व्हावेत म्हणून जन्मतं. 'बिरडं' त्या प्राणाची आणि प्राण्याची गळ्याची आण आहे" याची सत्यता पटते. आगामी काळात भास्कर चंदनशिव यांनी स्वतंत्रपणे कथालेखन करून ग्रामीण साहित्यात विशेषतः ग्रामीण कथेत विशेष स्थान प्राप्त केले.



Scanned with OKEN Scanner

निष्कर्ष

भास्कर चंदनशिव हे पुरेपूर ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभलेले लेखक असून 'ग्रामीण कथा' हा त्यांच्या साहित्यनिर्मितीचा प्रमुख प्रांत आहे. मराठीतील १९७० नंतरचे प्रमुख कथाकार म्हणून त्यांची प्रभावीपणे नोंद घेतली गेली. ग्रामीण माणसासंबंधीच्या जाणीवा व आकलन यांचा सुक्ष्माविष्कार त्यांच्या ग्रामीण कथेत घडतो. आशय व अभिव्यक्तीच्या अंगाने ग्रामीण कथेला अंतर्बाह्य बदलण्यात मोलाचा हातभार लावला. स्वतः खेड्यातून आलेले असल्याने वाङ्मयनिर्मितीत स्वयंभू अस्तित्व निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. 'बिरडं' या कथासंग्रहाचा विचार करता समाजाचे विविधांगी दर्शन घडवणाऱ्या घटकांना अग्रस्थान देण्याचे सामाजिक भान, त्यासाठी लागणारी अनुरूप भाषा त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांचे कथालेखन प्रत्ययकारी ठरले. कलात्मकतेसाठी ग्रामीण बोलीभाषेच्या सामर्थ्याचा कसोशीने व कल्पकतेने वापर करून कथेचे भरणपोषण केले. कृषीसंस्कृतीचा परीघ त्यांच्याभोवती असल्याने कृषीजीवनाशी संबंधीत भाषा व त्या भाषेतून व्यक्त झालेले कृषीजीवनातील प्रसंग कथेला समृद्ध करण्यास वळ देण्यास अत्यंत प्रभावशाली ठरतात.

भास्कर चंदनशिव यांचा 'बिरडं' कथासंग्रह अनेक अर्थांनी लक्षणीय ठरतो. ग्रामीण जीवनात घडणारे बदल व वास्तव टिपण्याच्या दृष्टीने कथासंग्रह महत्वपूर्ण ठरतो. मराठवाड्यातील ग्रामीण भागात वरचेवर येणारा दुष्काळ आणि माणसा गुरांचे त्यात होणारे हाल हा त्यांच्या कथालेखनातून येणारा व्यापक भाग आहे. दुष्काळाचे व त्यामुळे निर्माण झालेल्या भुकेचे, अस्वस्थतेचे चित्रण 'बिरडं' मधून येते. कधीही पूर्ण न होणारी पोटाची आग ग्रामीण जीवनाचा एक भाग आहे. तिचे दर्शन प्रभावीपणे घडवतात. समस्त शेतकऱ्यांचे दुःख प्रतिबिंबित करतात. ग्रामसंस्कृतीत बदलत्या काळानुसार मानवी जीवनास प्राप्त होत असलेले रूप ग्रामीण कथेतून मांडले. सर्वात विशेष बाब म्हणजे ग्रामीण माणसांच्या भावभावनांचे चित्रण करणारी त्यांची कथा भाषेमुळे अर्थपूर्ण व गुणवत्तापूर्ण ठरते. ग्रामीण जीवनानुभव घेणारे लेखक असल्याने ग्रामीण जीवन



Scanned with OKEN Scanner

त्र परिसर यापासून त्यांचे नाते दुरावले नाही. त्यामुळे लेखननिर्मितीच्या मुळाशी असलेली जीवनानुभव अभिव्यक्तीचे माध्यम असलेली मराठवाडी बोलीभाषा कलात्मक व संजीवक ठरते. म्हणूनच ग्रामीण जीवनानुभव व भाषाविष्काराचे दर्शन घडवणारा एक उत्तम नमुना म्हणून समर्थ कथालेखक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक तथा कथाकार म्हणून भास्कर चंदनशिव यांचा अग्रक्रमाने आवर्जून उल्लेख करावा लागतो. त्यांची नोंद घ्यावी लागते.

**संदर्भ :**


१. भास्कर चंदनशिव : 'बिरडं', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००७, पृष्ठ क्र. ०५.

२. अशोक देशमाने, 'चंदनशिवांची कथा : स्वरूपमीमांसा', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २४ एप्रिल २००८, पृष्ठ क्र. ९९, १००.

३. भास्कर चंदनशिव, 'बिरडं', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००७, पृष्ठ क्र. ०९.

४. तत्रैव, पृष्ठ क्र. ५८, ५९.

५. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जाने १९९२, पृष्ठ क्र. २४०.

६. अशोक देशमाने, 'चंदनशिवांची कथा : स्वरूपमीमांसा', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २४ एप्रिल २००८, पृष्ठ क्र. ११६.

७. म. द. हातकणंगलेकर, 'मराठी कथा : रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पूणे, प्रथमावृत्ती मार्च १९८६.





Scanned with OKEN Scanner

# प्रतिष्ठान

सप्टेंबर–ऑक्टोबर २०१७



मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.

Scanned with OKEN Scanner

# प्रतिष्ठान

सप्टेंबर-ऑक्टोबर २०१७
वर्ष : ६६ वे, अंक : पहिला

कार्यकारी संपादक
आसाराम लोमटे



संपादक मंडळ
डॉ. शेषराव मोहिते, डॉ. जगदीश कदम, प्रा. विलास वैद्य, डॉ. संजीवनी तडेगावकर, प्रा. हेमलता पाटील, देविदास फुलारी, विलास सिंदगीकर



अक्षरजुंळणी व मांडणी
कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., पुणे
(०२०) २४४७७५२७



संपादकीय पत्रव्यवहार :
आसाराम लोमटे
२४, संभाजीनगर, परभणी- ४३१४०१
aasaramlomte@gmail.com



**वार्षिक वर्गणी**

* व्यक्तीसाठी : ३०० रुपये
* संस्थेसाठी : ३५० रुपये

**त्रैवार्षिक वर्गणी**

* व्यक्तीसाठी : ८०० रुपये
* संस्थेसाठी : ९०० रुपये

**या अंकाची किंमत ५० रुपये**

**वर्गणी, वितरण संपर्क :**
मराठवाडा साहित्य परिषद,
अनंत भालेराव भवन, सन्मित्र वसाहत
औरंगाबाद- ४३१००१,
दूरध्वनी (०२४०) २३३३६०७


## अनुक्रम


- संपादकीय
  आसाराम लोमटे ........ २
- कविता
  अविनाश साळापुरीकर, माधवी मुठाळ,
  अनिल साबळे ........ ३
- कादंबरी अंश - पिंडीवरचे विंचू
  डॉ. भीमराव वाघचौरे ........ ११
- महानगरीय कादंबरी : काल, आज आणि उद्या
  संजय बोरुडे ........ २७
- उदगीर, उदगिरे आणि बोली
  प्रसाद कुमठेकर ........ ३४
- युगशिल्पी
  भालचंद्र शिंदे ........ ३८
- जागतिकीकरणानंतरच्या मराठी साहित्याची सर्वांगीण मीमांसा करणारा ग्रंथ
  डॉ. केदार काळवणे ........ ४२
- 'बगळा' निरागस भावविश्वाचा प्रभावी आविष्कार
  संदीप दळवी ........ ४८
- जगण्यावर विलक्षण श्रद्धा ठेवणारी कविता : काहीच नष्ट होत नसतं
  रफीक सूरज ........ ५५
- शून्य एक मी : वर्तमानाचा धीट आविष्कार
  डॉ. पंडितराव पवार ........ ५८
- मुखपृष्ठ : डॉ. नंदकुमार मोरे



- हा अंक आसाराम लोमटे यांनी संपादित केला असून, कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., पुणे येथे छापून कार्यवाह डॉ. दादा गोरे यांनी मराठवाडा साहित्य परिषदेसाठी प्रसिद्ध केला आहे.
- कृपया वर्गणी मनिऑर्डरने किंवा चेकने पाठवू नये. 'मराठवाडा साहित्य परिषद' या नावाने डिमांड ड्राफ्ट काढून पाठवावा.
- या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.


Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरणानंतरच्या मराठी साहित्याची सर्वांगीण मीमांसा करणारा ग्रंथ

## डॉ. केदार काळवणे

मराठीत वेगवेगळ्या कारणांनी संपादित केलेल्या ग्रंथांनी मराठी समीक्षा, संशोधन आणि इतिहासाला समृद्ध नि दुरुस्त करत साहित्याच्या आकलनाचा परीघ व्यापक केला आहे. साहित्य व्यवहारातील एखादे महत्त्वाचे विषयसूत्र घेऊन त्या विषयाला केंद्रवर्ती ठेवून निर्मित गौरवग्रंथांच्या संपादनांची परंपरा मराठीत वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली दिसते. साहित्य, समाज, संस्कृती आणि भाषा यांची अन्वयार्थक मीमांसा अशा गौरवग्रंथांमधून झालेली आहे. वा. ल. कुळकर्णी, दु. का. संत, गो. मा. पवार अशा मान्यवर समीक्षक-संशोधकांच्या गौरवार्थ प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांना संदर्भमूल्ये प्राप्त झालेले आहे. या ग्रंथांनी मूलगामी साहित्यविचार मांडलेला आहे. व्यक्ती गौरवाच्या आहारी जाणाऱ्या गौरवपर अभिनिवेशी ग्रंथांचाही सुकाळ आहे; परंतु त्यांना फारसे महत्त्व तर प्राप्त झाले नाहीच! उलट ते अदखलपात्र ठरले. व्यक्ती गौरवाचा सोस टाळून अलीकडे एक महत्त्वाचा गौरवग्रंथ प्रकाशित झाला आहे. 'जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी मराठी साहित्य' हे विषयसूत्र घेऊन प्रा. प्रल्हाद लुलेकर यांच्या गौरवार्थ 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' हा ग्रंथ सिद्ध करण्यात आलेला आहे. या ग्रंथाचे संपादन मराठीतील ज्येष्ठ लेखक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले व प्रा. दत्ता भगत यांनी केले आहे. मान्यताप्राप्त अभ्यासकांच्या अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश यात असल्याने या ग्रंथाचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. विषयाचे समग्र आकलन होईल या पद्धतीने ग्रंथाची मांडणी केलेली आहे. जागतिकीकरणोत्तर बदलत्या मराठी साहित्याची चिकित्सा करताना सर्वच अभ्यासकांनी सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्याचा साहित्याशी असणारा अन्वय उलगडून दाखवलेला आहे. त्यामुळे या काळातील साहित्यातून प्रकट झालेली सामाजिक घटिते, समाजमानस आणि समाजभाषा यांचे वस्तुनिष्ठ आकलन समोर येते. विषयाची समकालीनता आणि अभ्यासकांची समतोल दृष्टी यामुळे या ग्रंथाला संदर्भमूल्य प्राप्त झालेले आहे. सर्वच अभ्यासकांनी नोंदवलेले निष्कर्ष महत्त्वाचे तर आहेतच, शिवाय नव्वदोत्तर मराठी साहित्याचा चेहराही स्पष्ट करणारे आहेत. मान्यवर समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची विवेचक प्रस्तावना या ग्रंथाला लाभल्याने या ग्रंथाची मौलिकता वाढलेली आहे. या ग्रंथाचे महत्त्व तसेच स्वरूप स्पष्ट करताना डॉ. कोत्तापल्ले लिहितात, "जागतिकीकरणाचा मराठी समाज, संस्कृती आणि साहित्य यावर कोणता परिणाम झाला, याचे या ग्रंथामध्ये सूक्ष्म विवेचन केले आहे. जागतिकीकरणाची संकल्पना आणि व्याप्ती याचा वेध तर या ग्रंथात घेण्यात आलेलाच आहे. पण जनजीवनावर कोणकोणते परिणाम झालेले आहेत, याचाही आढावा घेण्यात आलेला आहे. जागतिकीकरणाच्या काळातील मराठी साहित्य केंद्रस्थानी ठेवण्यात आलेले असल्यामुळे विविध साहित्य प्रकारांमधून मराठी लेखकांनी जागतिकीकरणाला कसा प्रतिसाद दिला आणि त्यामुळे विविध साहित्य प्रवाहांनी कोणते रूप धारण केले याचाही विचार करण्यात आलेला आहे. जागतिकीकरण आणि त्याचा मराठी समाज, संस्कृती आणि साहित्य यावर काय परिणाम झाला याचा अभ्यास करावयाचा असेल तर हा ग्रंथ त्यासाठी संदर्भग्रंथच आहे, किंबहुना हा ग्रंथ टाळून अभ्यासकांना पुढे जाताच येणार नाही." (पृ. २६) या अवतरणामधून ग्रंथात चर्चिल्या गेलेल्या आशयाची बीजभूत भूमिका



Scanned with OKEN Scanner

विशद होते. या पार्श्वभूमीवर या ग्रंथाचे अंतरंग अधिक सखोलतेने समजून घेणे आवश्यक ठरेल. लेखांचा विस्ताराने परामर्श घेणे शक्य नसले तरी मुख्य विचारसूत्राचा निर्देश करत ग्रंथाची ओळख करून देण्याचा प्रयत्न या लेखातून केलेला आहे.

१९९० मध्ये आपल्या देशाने जागतिकीकरणाच्या माध्यमातून बाजारकेंद्री अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या व्यवस्थेत मूल्यांचा ऱ्हास तर झालाच त्यासोबत उद्योगपती अधिक गब्बर मात्र कंगालांचे अर्थशास्त्र बिघडले. शोषणाच्या नव्या मिती आकाराला येऊन दारिद्र्याची तीव्रता वाढली. जागतिकीकरणाच्या मागेमागे आलेल्या खासगीकरण आणि उदारीकरणाच्या व्याप्तीने देशातील जनसमूहांवर दूरगामी परिणाम केले. शेती, छोटे उद्योग तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक जीवन कमालीचे बदलले. सर्वहारा वर्गाचे वैयक्तिक-सामूहिक जीवन उद्ध्वस्त झाले. याचाच परिणाम म्हणून गेल्या दीड शतकात लाखो शेतकऱ्यांनी देशात आत्महत्या केल्या. इतरही अनेक प्रश्नांच्या मुळाशी जागतिकीकरणातून आकाराला आलेल्या अर्थकारणाचा वाटा आहे. एकंदरीत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर जागतिकीकरणाने आपला प्रभाव पाडलेला आहे. या प्रभावातून जे परिणाम झाले त्यातून नवे समाजवास्तव आकाराला आले. या समाजवास्तवाला साहित्याने कोणत्या नजरेतून पाहिले याचा शोध प्रस्तुत ग्रंथात घेण्यात आलेला आहे. या शोधातून नव्वदोत्तर साहित्याची दिशाही ध्वनित झालेली आहे.

सत्तावीस लेख या ग्रंथात समाविष्ट आहेत. या लेखांचे सूत्रबद्धरीत्या वर्गीकरण चार विभागांत करण्यात आलेले आहे. पहिला विभाग 'जागतिकीकरण : भाषा आणि साहित्य' हा आहे. या विभागात जागतिकीकरण, समाज, साहित्य आणि भाषा यांची समकालीनतेच्या संदर्भ अवकाशात चर्चा करणाऱ्या पाच लेखांचा समावेश आहे. 'जागतिकीकरण : अर्थ आणि अनर्थ' या पहिल्याच लेखातून डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांनी जागतिकीकरणाच्या संकल्पनेबरोबरच त्याच्या झालेल्या परिणामांचा सखोल परामर्श घेतला आहे. जागतिकीकरणातून उदयाला आलेल्या नव-वसाहतवादी व्यवस्थेच्या कचाट्यात येथील शोषित-वंचित समूह पिळला जात असल्याचे सूचन त्यांनी केले आहे. "जगातील विकसनशील देशांसाठी जागतिकीकरणाचा अर्थ आर्थिक गुलामगिरी यापेक्षा निराळा संभवतच नाही. एकीकडे प्रचंड गुंतवणूक व प्रगत तंत्रज्ञान तर दुसरीकडे श्रमांचा अत्यल्प मोबदला. दारिद्र्य, बालमजुरी, असुरक्षितता, विस्थापन, अस्थिर बाजारपेठा, पर्यावरण विनाश, कामगार कपात आणि विषमता ही या जागतिकीकरणाची अपरिहार्य फलश्रुती आहे." (पृ. ३२) हे डॉ. भोळे यांचे निरीक्षण जागतिकीकरणाचा फोलपणा स्पष्ट करणारे आहे. तटस्थ व अभिनिवेशविरहित दृष्टी ठेवून जागतिकीकरणाने बहुसंख्य समाज गटांचे जगणे अर्थहीन करून कसा अनर्थ घडविला याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण या लेखातून झाले आहे. या ग्रंथातील बीजलेख म्हणून या लेखाचा निर्देश करता येईल.

जागतिकीकरणाने कृषिकेंद्रित ग्रामजीवन उद्ध्वस्त झाले. कृषिप्रधान देशाची कृषी अर्थव्यवस्था कोलमडून पडली. शेती संकटात आल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. इतर कोणत्याही क्षेत्रांपेक्षा जागतिकीकरणाचा ग्रामीण संस्कृतीवर अधिक परिणाम झाला. या परिणामांचा अचूक अन्वयार्थ डॉ. यशपाल भिंगे यांनी लावला आहे. प्राचीन काळापासून मानवी विकासाच्या केंद्रस्थानी असलेली शेती ते आज होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा व्यापक पटावर त्यांनी 'रक्तबंबाळ ग्रामीण वर्तमान' मांडले आहे. या ग्रामीण वर्तमानाकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर 'भकास, उदास होत जाणाऱ्या खेड्यांसोबतच देशही वाळवंट होत जाईल' (पृ. ८६) हा त्यांनी दिलेला गंभीर इशारा सर्वांनाच आत्मचिंतन करायला लावणारा आहे.

उपरोक्त दोन्ही लेखांतून जागतिकीकरणानंतर उद्भवलेल्या शहरांपासून ते खेड्यापर्यंतच्या अनेक प्रश्नांचे अधोरेखन होते. हे प्रश्न वर्तमान, भारतीय जीवनाची गती-अधोगती ध्वनित करणारे तसेच समकालीन भारतीय समाजवास्तवाचे विखंडितीकरण स्पष्ट करणारे आहेत.

साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध असतो. सामाजिक स्थित्यंतरातून निर्माण झालेल्या प्रश्नांना साहित्य आपली आशय सामग्री बनवत असते. बदलत्या सामाजिक वास्तवाचे पडसाद साहित्यातून



44

Scanned with OKEN Scanner

उमटत असतात. समाजघटितांना साहित्यरूप देताना वास्तवाचे विविध पदरही उलगडत जातात. त्याचे आकलन अधिक स्वच्छ होत जाते. येथे वसंत आबाजी डहाके यांनी याच अन्वयदृष्टीतून १९९० नंतरच्या मराठी साहित्याचा वेध घेताना पूर्व संदर्भांचाही सामाजिक-सांस्कृतिक चौकटीत आढावा घेतला आहे. आणीबाणीनंतरच्या काळाचा विस्तृत पट आणि त्यातील स्थित्यंतरांची नोंद करत समकालीन साहित्याने दिलेल्या प्रतिक्रियेचे दीर्घ व सूक्ष्मदर्शी अर्थनिर्णयन केले आहे. हे अर्थनिर्णयन करताना त्यांनी १९९० नंतरचे मराठी साहित्य जीवनांचा सूक्ष्मपणे शोध घेत असल्याचा महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदवला आहे. आजचे मराठी साहित्य जागतिकीकरणानंतरचा समग्र कोलाहल टिपण्यात पूर्णपणाने यशस्वी झालेले नसले तरी "आजचे लेखक गंभीरपणे लिहीत आहेत." (पृ. ६२) हे त्यांचे निरीक्षण मोलाचे आहे, याच विवेचनसूत्राला धरून 'जागतिकीकरण आणि आजचे मराठी साहित्य' हा रणधीर शिंदे यांचा लेख याविषयाच्या विविध पैलूंची चिकित्सा करणारा आहे. "गेल्या दोन दशकांतील जागतिकीकरणाच्या संदर्भातील प्रक्रियेचे काही पडसादरूपी चित्रण मराठी साहित्यातून आले आहे. कवितेत ते काही प्रमाणात बारकाईने प्रकट झाले आहे. कथात्म साहित्यात या प्रक्रियेचे काही प्रमाणात अंतर्भेदी चित्रण आविष्कृत झाले आहे. मात्र, आजच्या काळात चहूमुखाने अंगावर येऊन कोसळणाऱ्या संवेदनेचे साकल्याने चित्रण मराठी साहित्यात आलेले नाही." (पृ. ७८) आजच्या मराठी साहित्याबद्दलचे हे भाष्य सर्वच लिहित्या हातांना अंतर्मुख करणारे आहे. कलावंतांनी समग्रपणे आजच्या काळातील सामाजिक स्पंदनांना, त्यातील ताण्याबाण्यांना सूक्ष्मपणे भिडले पाहिजे हे त्यांचे सूचन महत्त्वाचे आहे. या लेखाची व्याप्ती मोठी असली तरी त्यांनी नोंदवलेली अर्करूपी निरीक्षणे नवा समीक्षार्थ प्रकट करणारी आहेत.

जागतिकीकरणानंतर बदललेल्या भाषेचे वास्तव प्रत्ययकारकरीत्या नंदकुमार मोरे यांनी मांडले आहे. समाजाचे चलनवलन भाषेशिवाय अशक्य आहे. समाज नि संस्कृतीच्या विकासात भाषेची भूमिका मोलाची राहिलेली आहे. त्या त्या समूहाच्या भौतिक-अभौतिक जीवनाला प्रकट करणाऱ्या भारतीय प्रादेशिक भाषांची अवस्था नव्वदोत्तर काळात बिकट होत चाललेली आहे. त्यात मराठी भाषेचाही समावेश आहे. या वास्तवाचा वेध घेताना भाषेची परंपरा, इतिहास, इंग्रजी भाषेचे आक्रमण, बोलीभाषांचे महत्त्व, बोलीभूगोल, भाषा आणि साहित्याचा अनुबंध, भाषिक राजकारण यासह आजच्या मराठी भाषेची सामर्थ्यशीलता मोरे यांनी नोंदवून ही 'अकरा कोटी लोकांची भाषा सहजासहजी मरणार नाही" (पृ. १००) असा निष्कर्ष नोंदवला आहे. मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल चिंता करणाऱ्या चिंतकांना तसेच भाषेचे संवर्धन करणाऱ्या भाषिकांनाही या लेखातून प्रकट झालेले भाषिक विचार दिग्दर्शन करणारे आहेत.

समाजात जेव्हा काही परिवर्तने येतात तेव्हा त्याचा परिणाम साहित्याच्या वाङ्मय प्रकारावरही होत असतो. आशय आविष्काराच्या अनेक शक्यता तर निर्माण होतातच, शिवाय आविष्काराच्या अपरिहार्य निकडीतून रूपविस्तारही होतो. जागतिकीकरणा-नंतरच्या मराठी साहित्याअंतर्गत येणाऱ्या विविध वाङ्मय प्रकारांचेही असेच झाले. या काळातील मराठी साहित्यात आशय अभिव्यक्ती आणि भाषिकदृष्ट्या झालेल्या बदलांचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न या ग्रंथाच्या 'वाङ्मय प्रकार : स्वरूप आणि वाटचाल' या दुसऱ्या भागात झालेला आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक या प्रमुख वाङ्मय प्रकारासोबतच आत्मकथन, चरित्र, आत्मचरित्र आणि ललितगद्य या प्रमुख वाङ्मय प्रकारांचे रूपविशेष रिचवून आविष्कृत होणाऱ्या साहित्याच्या सीमारेषांवरील वाङ्मय प्रकाराचेही स्वरूप तपासण्यात आलेले आहे. नियतकालिके आणि समीक्षा यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या नव्वदोत्तर वाटचालीचा आढावाही महत्त्वाचा आहे. नऊ लेखांच्या माध्यमातून केलेली ही चिकित्सा जागतिकीकरणोत्तर मराठी साहित्यातील वाङ्मय प्रकाराची वाटचाल अधोरेखित करणारी आहे.

वसंत पाटणकर यांनी जागतिकीकरणाच्या नजरेतून कवितेचे वाचन केले आहे. समकालीन कवितेने जागतिकीकरणाला दिलेल्या प्रतिसादाचा विस्तृत पट या वाचनातून साकारला आहे. जागतिकीकरणामुळे पारंपरिक मूल्यव्यवस्थेला तडे जाऊन मानवी जगण्याच्या केंद्रस्थानी वस्तुशरणता आल्याने परात्मता, अर्थशून्यता, असुरक्षितता, असंबद्धता अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांचे संवेदन या



45

Scanned with OKEN Scanner

काळातील मराठी कवितेतून प्रकट होत असल्याचे प्रकटन पाटणकरांनी केले आहे. त्यांनी आधुनिक प्रबोधनाची मानववादी जीवनदृष्टी अशा दोन गटात या कवितेचे विश्लेषण केले आहे. ''महानगरीय आणि आधुनिकवादाच्या प्रभावाखालील कवींनी जागतिकीकरणाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. त्या तुलनेत महानगराबाहेरील आणि प्रबोधनाच्या मानववादी परंपरेतील कवींना या व्यवस्थेला तितका प्रतिसाद दिला नाही.'' (पृ. १३९) हे त्यांचे निरीक्षण वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे आहे. अराजक निर्माण करणाऱ्या काळाचे चित्र कवितेतून येताना ते पुरेशा गांभीर्याने येत नसल्याचे तसेच भाषेची कृत्रिमता आणि व्यवस्थेला विरोध करताना तिला प्राप्त झालेल्या कंठाळी स्वरूपाचाही निर्देश पाटणकर करतात.

मराठी साहित्यात कथा हा वाङ्मय प्रकार महत्त्वाचा असूनही त्याला सातत्याने दुय्यमत्व देण्याची भूमिका मराठीत भालचंद्र नेमाडे व रंगनाथ पठारे यांच्या विधानांचा चुकीचा अर्थ घेतल्याने रूढ झाली. कथा या वाङ्मय प्रकाराची ही प्रतिमा पुसण्याचा अत्यंत चांगला प्रयत्न आसाराम लोमटे यांच्या 'नव्वदोत्तरी कथा : स्तर-अस्तर' या लेखाने केला आहे. कथेचा प्रारंभ, आकृतिबंध, मराठी कथेची परंपरा ते नव्वदोत्तरी कथेचे स्वरूप अशा व्यापक चौकटीत त्यांनी मांडणी केली आहे. ''आरंभ-मध्य-शेवट' या एकाच साच्यातून बाहेर पडलेली कथा आजच्या व्यामिश्र जगण्याला भिडू पाहते हे तर खरेच; पण या जगण्याबद्दल ती काही विधानही करू पाहते.'' (पृ. १५१) हे त्यांचे विधान आजच्या विस्तारित कथासृष्टीची प्रकृती स्पष्ट करणारे आहे. अनुभव आविष्काराची बदललेली केंद्रे आणि जीवनानुभवाची सजीव व प्रत्ययकारी अभिव्यक्ती यामुळे नव्वदोत्तर कथा सशक्त होत असल्याचे निरीक्षण अनेक उदाहरणांच्या माध्यमातून लोमटे यांनी नोंदवले आहे. विविध भौगोलिक प्रदेश-सामाजिक स्तर यांना कवेत घेणारी ही कथा बहुस्तरीय तसेच बहुस्वरीय असल्याचेही मत त्यांनी मांडले आहे. आजच्या कथेच्या स्तर-अस्तराची इतकी मूलगामी चिकित्सा अपवादानेच मराठीत झाल्याचे चित्र आहे.

डॉ. महेंद्र कदम यांनी कादंबरीचे आकलन मांडताना प्रयोगशीलतेच्या अंगाने विचार केला आहे. नव्वदोत्तर कादंबरीबरोबरच मागील पन्नास वर्षांतील प्रयोगशील कादंबरीचा आढावा घेतलेला आहे. ''गेल्या पन्नास वर्षांतील प्रयोगशील कादंबरीचा प्रवास, व्यक्तिवाद, समूहवाद आणि व्यक्तिवाद यांच्यातील संघर्ष तसेच जागतिकीकरण आणि व्यक्तिसमूह यांच्यातील संघर्षातून वाट्याला आलेले वस्तुरूप अशा चार टप्प्यांनी झालेला दिसून येतो.'' (पृ. १७३) हा त्यांचा निष्कर्ष समकालीन कादंबरी समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

'भर समुद्रात मध्यभागी' या प्रवीण भोळे यांच्या लेखातून नव्वदोत्तर नाटक आणि नाट्यचळवळीची वाटचाल स्पष्ट होते. नाटकाच्या एकूण प्रकृतीची मीमांसाही या लेखातून झालेली आहे. आत्मकथन, चरित्र-आत्मचरित्र आणि ललितगद्य हे वाङ्मयप्रकार व्यक्तिगत तसेच व्यक्तिनिष्ठ स्वानुभव, गतस्मृती, व्यक्तिचित्रे, प्रवासवृत्ते, आठवरूपे, जीवनप्रवास, भावरूपे यांना आशयकेंद्रे बनवत असल्याने सामाजिक स्थित्यंतरांचे त्यांच्या परिणामांचे सखोल-सूक्ष्मदर्शी प्रतिबिंब यात क्वचितच घडते. त्यामुळे जागतिकीकरणानंतरच्या जीर्ण-विदीर्ण समूहाचा आवाज समग्रपणाने या वाङ्मयप्रकारातून प्रकटण्याची शक्यता धूसर आहे. असे असले तरी या वाङ्मय प्रकाराअंतर्गत झालेल्या साहित्यनिर्मितीचे नव्वदोत्तर स्वरूप अभ्यासावे या उद्देशाने येथे या निर्मितीचाही विस्तृत आढावा घेण्यात आलेला दिसतो. या अनुषंगाने १९९० नंतरची दलित आत्मकथने : एक अवलोकन' (डॉ. वासुदेव मुलाटे) व 'नव्वदोत्तर आत्मचरित्र' (डॉ. कैलास अंभुरे) हे दोन लेख आत्मपर साहित्याचे स्वरूप विशद करणारे आहेत. या दोन्ही अभ्यासकांनी १९९० नंतर या वाङ्मय प्रकारात विपुल लेखन होऊन त्यांचा विविधांगी विस्तार होत असल्याचे नोंदवले आहे. नवबौद्धांसह कोल्हाटी, चर्मकार, पारधी, फासेपारधी, मातंग, वडार, आदिवासी अशा विविध जात व समाजगटातील लेखकांनी आत्मकथन हा वाङ्मयप्रकार समृद्ध केला, असे डॉ. मुलाटे यांना वाटते, तर साहित्य, समाज, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, स्त्री विश्व अशा विविध क्षेत्रांतील अनुभव आत्मचरित्रातून प्रकट होत असल्याचे मत डॉ. अंभुरे यांनी नोंदवलेले आहे.



Scanned with OKEN Scanner

ललितगद्य हा मुक्त वाङ्मयप्रकार आहे म्हणून त्याला मुक्तगद्य असेही म्हटले जाते. प्रमुख वाङ्मयप्रकारांचे सत्त्व घेऊन 'स्व'ला केंद्रस्थानी ठेवत आशयाचे आविष्करण करणाऱ्या या वाङ्मय प्रकाराला साचिव असा आकृतिबंध नाही. विषयाचीही कुठली मर्यादा नाही. अशा या फॉर्मलेस वाङ्मय प्रकारातून मराठीत दखलपात्र लेखन झाले. डॉ. दत्तात्रय घोलप यांनी १९९० नंतरच्या ललित गद्याचा आशय वैविध्य व रचनातत्त्वासह समर्पक परामर्श घेतला आहे. समकाळाचे संदर्भ शोधत घेतलेला हा परामर्श नव्वदोत्तर काळात विस्तारलेल्या ललित गद्याची यथोचित नोंद घेणारा आहे. "१९९० नंतरच्या ललितगद्याचे स्वरूप विविधांगी असून, त्यामध्ये आत्माविष्कार केंद्रवर्ती राहिला आहे, असे असले तरी लेखकांनी 'स्व'चे जीवन समाजवास्तवाच्या व्यापक पटावर चित्रित केले आहे, त्यामुळे हे लेखन चाकोरीबद्ध झालेले नाही." (पृ. २४७) हा त्यांचा निष्कर्ष काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या या वाङ्मयप्रकाराची भविष्यातील आश्वासक वाटचालीची खात्री देणारा आहे.

प्रवीण बांदेकर यांनी नव्वदनंतरची नियतकालिके आणि कविता असा अनुबंध तपासला आहे, तर नियतकालिकांमधील समीक्षेचा शोध 'अभिधा'आणि 'अभिधानंतर'च्या संदर्भात डॉ. आशुतोष पाटील यांनी घेतला आहे. त्या त्या काळातील साहित्य प्रकाशात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नियतकालिकांनी केले आहे. या नियतकालिकांमधून झालेली सकस-निकस साहित्याची चर्चा मराठी साहित्य अभिवृद्धीसाठी पोषक ठरलेली आहे. हे नियतकालिकांचे महत्त्व लक्षात घेऊन उपरोक्त अभ्यासकांचे लेख या ग्रंथात समाविष्ट केलेले दिसतात. या लेखांमधून नव्वदोत्तर नियतकालिकांची भूमिका व वाटचाल ध्वनित झालेली आहे. प्रामुख्याने या काळातील कवितेला केंद्रस्थानी ठेवून केलेली ही मांडणी जागतिकीकरणोत्तर कवितेला असलेल्या काळभान मूल्यभानाचे अधोरेखन करणारी आहे.

जेव्हा जेव्हा जीवनात परिवर्तने येतात तेव्हा साहित्यातही ठळक असे बदल होत असतात. मराठी साहित्याच्या निर्मितीपासून ते आजपर्यंतच्या साहित्याचा पट डोळ्यांसमोर ठेवला तर ही बाब प्रकर्षाने जाणवते. मराठी साहित्यातील प्रवाहांच्या मुळाशी सामाजिक स्थित्यंतर हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट करता येईल. साठोत्तरी साहित्य प्रवाह निर्मितीच्या प्रेरणा या जीवनसंबद्ध आहेत. शोषित समूहांना आत्मभान आल्याने ते समूह साहित्यातून अभिव्यक्त झाले. जीवनजाणिवांच्या वेगळेपणातून त्यांना अस्तित्व प्राप्त झाले. ग्रामीण, दलित, आदिवासी यांसह सबंध स्त्रीसमूहाचा आवाज प्रकट करणाऱ्या या प्रवाहांनी नव्या अनुभवविश्वाचे आविष्करण करून मराठी साहित्य समृद्ध केले. शिवाय मराठी साहित्याला सामाजिकतेचा चेहरा प्राप्त करून दिला. १९९० नंतर या प्रवाहांनी कोणते रूप धारण केले याचा शोध या ग्रंथाच्या 'वाङ्मयीन प्रवाह : परंपरा आणि सद्यस्थिती' या तिसऱ्या भागातील नऊ लेखांतून घेण्यात आलेला आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी या मुख्य प्रवाहांबरोबरच मुस्लिम, ख्रिस्ती, जैन आणि विज्ञान व बालसाहित्याचाही वेध घेण्यात आलेला आहे.

ग्रामीण समाज आणि साहित्याच्या सद्यस्थिती संदर्भात माधव पुटवाड यांनी विवेचन केले आहे. या विवेचनात त्यांनी ग्रामीण साहित्यातील दोन प्रवृत्तींचा निर्देश केला आहे. ग्रामीण जीवनाचे गौरवीकरण व समकालीन ग्रामीण वास्तवाचे चित्रण या त्या प्रवृत्ती होत. परंतु दुसऱ्या प्रवृत्तीच्या अनुषंगाने फारच कमी लोकांनी लेखन केले असे पुटवाडांना वाटते. हे लोक कमी जरी असले तरी त्यांनी जागतिकीकरणानंतरच्या ग्रामवास्तवाला सूक्ष्मपणे रेखाटले ही वस्तुस्थितीही त्यांनी अधोरेखित केली आहे. हे अधोरेखित करताना वैचारिक अधिष्ठान असल्याशिवाय ग्रामवास्तवाचे नीटपणाने आकलन होणार नाही याचेही सूचन त्यांनी केले आहे. म. गांधी आणि म. फुले यांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान ग्रामीण साहित्याला असल्याचा जो दावा केला जातो तो कसा संभ्रमित आहे याचाही निर्देश ते करतात. ग्रामीण साहित्यिकांना आत्मचिंतन करायला लावणारी ही मांडणी दिशादर्शक आहे.

जागतिकीकरणोत्तर दलित साहित्याची मीमांसा करताना प्रा. महेंद्र भवरे यांनी दलित कथा, कादंबरी, कविता, नाटक व आत्मकथन यांचा विस्तृत आढावा घेतलेला आहे. दलित साहित्याचा उदय, परंपरा, प्रेरणा, स्वरूप यांचा धांडोळा घेत या साहित्याला सुरुवातीपासूनच पक्के वैचारिक अधिष्ठान असल्याने सामाजिक घटितांचे नेमके आकलन प्रकट झाल्याचे



Scanned with OKEN Scanner

त्यांनी नमूद केले आहे. नव्वदोत्तर दलित साहित्याची विस्ताराने घेतलेली ही नोंद जागतिकीकरणाच्या प्रभावाचे नेमके आकलन मांडणारी आहे. असाच वेध स्त्रीवादी साहित्यासंबंधी डॉ. वंदना महाजन यांनी घेतला आहे. भारतीय स्त्रीवादाच्या परिप्रेक्ष्यात त्यांनी केलेले नव्वदोत्तर स्त्रीवादी साहित्याचे विवेचन महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणाने वैश्विक जाणिवेला आकार दिलेला असला तरी 'गौरी देशपांडेपासून कविता महाजनपर्यंत धाडसी लेखिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लेखिकांनाही स्त्रीचं स्वतंत्र होणं म्हणजे नेमकं काय याचे उत्तर सापडत नाही.'' (पृ. ३८२) हा महत्त्वाचा प्रश्न त्यांनी उपस्थित करून प्रश्नांकित केले आहे.

इतर शोषित समूहांना जसे जागतिकीकरणाने उद्ध्वस्त केले तसेच आदिवासी समाजालाही त्याचे परिणाम भोगावे लागले. जल, जमीन, जंगल यांच्यावर आक्रमण होऊन आदिवासींचे मोठ्या प्रमाणात या काळात विस्थापन झाले. त्यातून त्यांच्या अस्तित्वाचे गंभीर प्रश्न निर्माण झाले. या वास्तवाला मुखरित करणाऱ्या साहित्याची सूक्ष्म चिकित्सा डॉ. विनोद कुमरे यांनी केली आहे.आदिवासींच्या आजच्या प्रश्नांची समर्पक नोंद सर्जनशील जाणिवेच्या व सामाजिक बांधिलकीच्या लेखनाने आपल्या अभिव्यक्तीतून घेतल्याचा महत्त्वपूर्ण निष्कर्ष डॉ. कुमरे यांनी नोंदवला आहे.

या प्रमुख वाङ्मयीन प्रवाहाबरोबरच मुस्लिम, ख्रिस्ती आणि जैन समाजातही आत्मभान येऊन साहित्य चळवळींना प्रारंभ झाल्याचे दिसते. त्यांनीही आपल्या जाणिवांना साहित्यातून अभिव्यक्त केले आहे. जागतिकीकरणानंतर या धर्मीयांच्या साहित्यातून कोणते संवेदन प्रकट झाले याचा वेध अनुक्रमे फ. म. शहाजिंदे (मुस्लिम मराठी साहित्याची पुढील दिशा), डॉ. सिसिलिया कार्व्हालो (मराठी भाषक ख्रिस्ती समाजीय लेखकांचे लेखन) व डॉ. अलका वालचाळे (जैन कथेचे वेगळेपण) यांनी घेतलेला आहे. जागतिकीकरणानंतर या समाजातही काही उलथापालथ झाली आणि त्याचे आविष्करण या साहित्याने समर्थपणे केल्याचे मत या अभ्यासकांनी मांडले आहे.

साठोत्तर काळात जे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले त्यांनी जागतिकीकरणानंतरच्या शोषित जीवनाशयाला, त्यातील ताणाबाण्यांना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला असेच उपरोक्त लेखकांचे मत आहे. जागतिकीकरणानंतर पूर्वापार शोषित समूह अधिक पिचले जाऊन त्यांचे अस्तित्वच धोक्यात आल्याचे गंभीर वास्तव या काळातील विविध प्रवाहातील साहित्याच्या निरीक्षणातून अधोरेखित होते.

या ग्रंथातील 'जागतिकीकरणानंतरच्या विज्ञानकथा' (निरंजन घाटे) व 'मराठी बालसाहित्य आणि अनुवाद व्यवस्था' (पृथ्वीराज तौर) हे दोन्ही लेखही महत्त्वाचे आहेत. या लेखांतून विज्ञान आणि बालसाहित्यावर नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे.

प्रा. प्रल्हाद लुलेकर यांच्या व्यक्तिमत्त्व आणि कार्याला अनेक पैलू आहेत. शिक्षक, पत्रकार, प्रशासक, लेखक, विचारवंत, कवी, समीक्षक, संशोधक, वक्ता म्हणून त्यांनी आपली ओळख महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात निर्माण केली आहे. आपल्या लेखन आणि वक्तृत्वातून वंचित-उपेक्षितांच्या प्रश्नांचा जागर घडविला. सामाजिक समतेचा आग्रह धरत नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहिले. अशा या व्यक्तित्वाचा आणि त्यांच्या लेखनाचा परिचय करून देणारे चार लेख या ग्रंथाच्या 'प्रा. प्रल्हाद लुलेकर : व्यक्ती आणि साहित्य' या चौथ्या भागात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. यशवंत मनोहर, डॉ. गजानन जाधव, केदार काळवणे व प्रवीण लुलेकर यांनी लुलेकरांच्या कार्याचा व्यापक परिघ उलगडून दाखविला आहे.

एकंदरीत जागतिकीकरणानंतरच्या मराठी साहित्याचा सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात अन्वयार्थ लावणारा महत्त्वाचा संदर्भग्रंथ म्हणून या ग्रंथाचा निर्देश करता येईल. नव्वदोत्तर साहित्याचा इतिहासही यातून ग्रथित होतो. मराठी समीक्षा, संशोधन आणि इतिहास व्यवहाराला साह्यभूत ठरणाऱ्या या ग्रंथाचा सर्वच साहित्य समीक्षकांना उपयोग होणार आहे. म्हणून या ग्रंथाचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य संपा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. दत्ता भगत, प्रकाशक- सायन पब्लिकेशन प्रा.लि., पृष्ठे- ५४३, किंमत- ६०० रुपये.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner

विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली व
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या सौजन्याने

## एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

दि. १८/०९/२०१७




# नव्वदोत्तरी मराठी कविता

NANDED

आयोजक

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच

The Best College Award by SRTMU Nanded
College with Potential for Excellence (status awarded by U.G.C)
NAAC Reaccredited 'A' GRADE (third Cycle 2013) with 3.29 CGPA
An ISO 9001:2008 Certified College &
DST-FIST Sponsored College

संपादक

३६. 'मराठवाड्यातील नव्वदोत्तरी कवितेतील ग्राम संस्कृतीचे चिंतन एक अभ्यास' – प्रा.डॉ. मंजुषा वि. भटकर १८३
३७. नव्वदोत्तरी मराठी कवितेवर पडलेला जागतिकीकरणाचा प्रभाव – डॉ. विजया खामनकर १८६
३८. जागतिकीकरण आणि मराठी महानगरीय कविता – प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे १८८
३९. बांडा हंगाम मधील शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा – प्रा. मधुकर जाधव १९३
४०. नव्वदोत्तर मराठी कविता : राजकारण व सत्ताकारणाची प्रखर भाष्यकार – प्रा.डॉ.अजय वसंतराव गव्हाणे १९६
४१. २००० नंतरच्या काळखंडातील ऊर्जावान कवी : अक्षय घोरपडे – प्रा.डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील १९९
४२. गावशिवाराचा वास्तव जीवनपट : गावशिव – प्रा.प्रशांत भंडे २०२
४३. नागर जीवन व्यक्त करणारी अशोक कोतवालांची कविता – प्रा. संभाजी बाबाराव सावंत २०५
४४. १९९० नंतरच्या कवितेतील स्त्रियांचे भावविश्व – डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी २०७
४५. नव्वदोत्तरी मराठी कवितेत आलेले लोकप्रशासनाचे चित्रण – प्रा.डॉ. गिरा विठ्ठलराव फड २०९
४६. नव्वदोत्तरी मराठी कवितेतील दलित जाणिवा – डॉ. अनिल व्यंकटराव मुंढे २११
४७. झेपावणाऱ्या पंखातून चित्रित झालेल्या विद्रोही कविता – डॉ. सविता अशोक व्हटकर २१४
४८. काव्यात शास्त्रीय संगीताचे स्थान (इ.स.१९९० च्या व नंतरच्या चालींचा आढावा) – प्रा.सौ.संगीता रमाकांत चाटी २१९
४९. अशोक कौतिक कोळी यांच्या गावकडच्या कविता – प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत २२१
५०. नव्वोदत्तरी मराठी कविता – प्रा.डॉ.लक्ष्मण वाघमारे २२८
५१. प्रकाशवाटा काव्यसंग्रहातील जाणिवा... – प्रा.डॉ. जयद्रथ जाधव २२९
५२. 'आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश' या काव्यसंग्रहातील गुलामीचे चित्रण – प्रा. एस. जी. खुपसे २३१
५३. शंकर वाडेवाले यांच्या कवितेतील बदलते ग्रामवास्तव – प्रा. डॉ. सूर्यप्रकाश वैजनाथराव जाधव २३४
५४. नव्वदोत्तरी आंबेडकरवादी कवितेतील सार्वत्रिक विषमता व क्रांतिसन्मुखतेची जाणीव – प्रा. डॉ. भास्कर विठ्ठलराव नरवाडे २३७
५५. दया पवार यांच्या कवितेतील स्त्रीदर्शन – प्रा.डॉ. एस.बी. शिंदे २४१
५६. १९९० नंतरची भालेरावांची विद्रोही कविता – डॉ. सौ. जयदेवी पवार २४४
५७. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कविता – डॉ. चंद्रकांत शेरखाने २४८
५८. कवी विठ्ठल वाघ यांच्या 'खापराचे दिवे' या कवितेतील समाजवास्तव आणि प्रतिमाविश्व – प्रा.नरेंद्र जनार्दन पाखरे २५२
५९. जीवन संघर्षाचा शोध घेणारी कविता : 'माय आणि हुंदके' – प्रा. नारायण शिवशेट्टे २५६
६०. ''नव्वदोत्तरी मराठी स्त्रीवादी कविता'' – उज्वला रुपचंद राजगुडे २६२
६१. 'स्व' जाणिवेची कविता – डॉ. मारोती कोल्हे २६५
६२. 'बळीवंत' म्हणजे शेतकऱ्यांच्या दुःखाची गाथा – प्रा. संगीता मुंढे २७०
६३. १९९० नंतरची इंद्रजित भालेराव यांची कविता – प्रा. डॉ. संजय जगताप २७३
६४. उत्कट भावनांचा आविष्कार – पाथेय – प्रा. लालबा चां. दुस्टकर २७८
६५. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणीवेचे स्वरूप प्रा. नामदेव वाघमारे २८२
६६. समकालीन वास्तव,जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी मराठी कविता – माधव हैबतकर २८५
६७. नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितेतील कृषी वास्तव – प्रा. रवींद्र दे. डाखोरे २८९
६८. 'भारेकरी जेव्हा मातीला येतात' मधील नवजाणिवा – डॉ.लहू दिगंबर वाघमारे २९२
६९. नवदोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण – प्रा.डॉ. ममता इंगोले (महल्ले) २९८
७०. अस्वस्थ काळाच्या वेदना व्यक्त करणारा कवी : फ. म. शहाजिंदे – प्रा. मुतवल्ली मैजोद्दीन मैनोद्दीन ३०५
७१. नव्वदोत्तर ग्रामीण कवितेतील बदलते सामाजिक जीवन : एक दृष्टिक्षेप – प्रा.डॉ.आर.डब्ल्यू. नवघडे ३१०
७२. 'सीताराम मास्तरचं अगतिकीकरण' – अरुण काळे ( कवितासंग्रह : नंतर आलेले लोक ) – प्रा.डॉ. यशपाल भिंगे ३१६
७३. नव्वदोत्तरी मराठी महानगरीय कविता – प्रा. कविता पाटील ३१८
७४. नव्वदोत्तरी मराठी कविता आणि बदलते सामाजिक संदर्भ – प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे ३२०


 ISBN : 978-81-923487-5-9

## १९९० नंतरच्या कवितेतील स्त्रियांचे भावविश्व

डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
(शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय)
कळंब जि. उस्मानाबाद.

साहित्य व समाज यांचा प्रवाह समांतर असा आहे. मानवी जीवनाला सर्वाधिक जवळचा असणारा साहित्य प्रकार म्हणजे कविता. कथा, कविता, कादंबरी नाटक व चरित्र अशा साहित्य प्रकारातून सातत्याने मानवी जीवनाविषयी चिंतन केले जाते. असे असले तरी अधिकाधिक प्रमाणात राजकीय, सांस्कृतिक, भौतिक जीवनाविषयी कवितेतून अनेक कवींनी मांडणी केल्याचे दिसते भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि खऱ्या अर्थाने सर्वच क्षेत्रात परिवर्तनाची नांदी सुरू झाली. मराठी साहित्यात स्वतंत्र असे साहित्यप्रवाह निर्माण झाले. यामध्ये आदिवासी, ग्रामीण, दलित, जनवादी व स्त्रीवादी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. स्वतंत्रपणे स्त्रीवादी चळवळ गतिमान झाली. भारतीय समाजव्यवस्थेतून स्त्रियांना दुय्यम दर्जा व स्थान दिले गेले. याचा परिणाम म्हणून स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांचे हक्क, कर्तव्य, समानसंधी, समान विचार व लेखन स्वातंत्र्य, शिक्षण–नोकरी व आरक्षण या विविध सामाजिक न्यायासाठीची चळवळ म्हणून विकसित होत गेली. खऱ्या अर्थाने आत्मसन्मान व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार या माध्यमातून करण्यात आला. परंपरागत समाजव्यवस्थेला स्त्रियांनी स्वतंत्र अस्मितेविषयी प्रश्न विचारला. अनेक प्रश्नांची उकल व जाणिवांसाठी स्त्रियांना कविता हा साहित्यप्रकार अधिक व्यापक वाटला. एकेठिकाणी परिस्थिती विरूद्ध लढा देण्यासाठी, बंडाची भाषा पहिल्यांदाच करणारी स्त्री म्हणते,

का फक्त आम्हीच कुलशील जपायच?
का फक्त आम्हालाच बंधन लक्ष्मण रेषेचं? – आशा भिडे

जगात श्रेष्ठ असणाऱ्या पण स्त्रियांच्या बाबतीत विषमता निर्माण करणाऱ्या पुरूषप्रधान समाजव्यवस्थेला आपल्या 'स्व' संरक्षणाविषयी, अस्मितेविषयी जेंव्हा एखादी कवयित्री गीतांजली सुकळकर आपल्या 'कात टाकलीय आता' या कवितेत.. .

सावधान,
कात टाकलीय आता
अडगळीतल, कडेकपारितले
पडक्या, जुन्या हवेल्यांचे
गडगडणाऱ्या गढ्यांचे
आश्रय त्यागलेत मी आता ...

याच प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्याची भूमिका व्यक्त करताना कवयित्री पद्मा गोळे आपल्या 'मी घरात आले' कवितेत.

आता सोंग पूरे झाली,
उतरून ठेवून आता तरी
तुकडे तुकडे जमवू दे
मोकळा श्वास घेऊ दे,
घेत घेत जाऊ दे!

स्त्रियांची व्यापक भावना, प्रस्थापित व्यवस्थेला कडाडून विरोध करणारी कृती, पुरुषसत्ताक संस्कृ आजवर सहन केला परंतू घटनेप्रमाणे शिक्षण, नोकरी, आरक्षण, इ. क्षेत्रात समान संधी, दर्जा व प्रतिष्ठा मि कठोर भाषा स्त्रीवादी चळवळीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे.

एकीकडे सर्वच क्षेत्रात विज्ञानवादी सुधारणेचे वारे वाहत आहे. मात्र माझ्या घरात आजही समतेचा न याच कालखंडात स्त्रीवादी भूमिकेतून मांडणी करणाऱ्या हिरा बनसोडे, अश्विनी धोंगडे, रजनी परुळेकर, अनु आम्नर शेख, संजीवनी मराठे, आसावरी काकडे, प्रज्ञा पवार, वृषाली किन्हाळकर, सुमती लांडे, नीरजा कि कितीतरी स्त्रिया याच अनुषंगाने आपल्या महानगर कवितेत बाईचे 'बाई' असणे नाकारून दुसरीकडे पुरुषाशिवा असे सामाजिक व्यवस्थेने परिस्थिती निर्माण केल्याने यावर कवयित्री म्हणते,

''शहरातल्या आणि जगातल्या बायका
विचारात पडल्यात असं चित्र
आवडणार नाही कुणालाच
त्या एक प्रियकराच्या बाहुपाशात असतात
किंवा व्हीनसची असतात
हात तोडलेली नग्न सुंदरी असतात''

बऱ्याचदा स्त्री आपल्या भावविश्वाचा, अस्मितेचा शोध घेताना तिची, मानसिक, शारीरिक, भावनिक आपल्या अवतीभोवतीच्या अनुभवातून स्त्री असण्याचा अर्थ कवितेत आसावरी काकडे रेखाटताना दिसतात.

''एक स्त्री दुखा वेचते आहे
तिच्या मनात आजच्या स्वयंपाकाचा मेनू ठरतो आहे
तिला बहुधा एकविशी गाठायची
आणि सव्वानऊची बस सुद्धा
तिने हाताचा वेग वाढवलाय

स्त्रियांची कविता मानसिक व समूहमनाची व्यथा विशद करणारा सामाजिक विषमतेवर भाष्य करताना दिस नातेसंबंध व स्त्री–पुरूष संबंधावर आधारलेली कवयित्री नीरजा यांची कविता,

समाजव्यवस्थेत स्त्रियांचा प्रवास दुखातून हजारो वर्षापासूनच एक माणूस म्हणून तिची भूमिका या साहित आहे. स्त्रीवादी कविता अनेक विचारांचे वादळ विशद करणारी मुक्तछंदावर आधारीत आहे. स्त्रीवादी चळवळीनी निर्मि असमतोल आचरणातून निर्माण पुरूषांना विरोध किंवा परिस्थितीला न्याय मागणे यातून स्त्रीवाद उदयास आलेला आहे.

संदर्भग्रंथ :

नीरजा, कविता मुंबईच्या, प्रकाशक य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.
सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
खंदारे उषा, (संपा.), कविता स्त्री जाणिवेच्या, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.

 ISBN : 978-81-923487-5-9

Scanned with OKEN Scanner

विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली व
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या सौजन्याने

एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

दि. १८/०९/२०१७




# नव्वदोत्तरी मराठी कविता

NANDED

आयोजक

**मराठी विभाग**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे

**यशवंत महाविद्यालय, नांदेड.**

- The Best College Award by SRTMU, Nanded
- College with Potential for Excellence (status awarded by U G C)
- NAAC Reaccredited 'A' GRADE (IIIrd Cycle 2016) with 3.29 CGPA
- An ISO 9001:2008 Certified College & DST-FIST Sponsored College

www: ymnanded.in

संपादक

डॉ. संगीता घुगे

डॉ. शंकर विभुते

ISBN : 978-81-923487-5-9

© Copyright
Prinpcipal
YESHWANT MAHAVIDYALAYA
Nanded, Maharashtra, India

**Editor:**
**Dr. Sangeeta Ghuge**
**Dr. Shankar Vibhute**

**Assitant Editor:**
**Dr. Sanjeevkumar Panchal**

**Publisher**
Yashwant Publication
YESHWANT MAHAVIDYALAYA
Nanded, Maharashtra, India

**Printed at**
Mudra Offset Printers & Processors
M.G. Road, Nanded. Ph. : 242109

9 788192 348759

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका


१. बीज भाषण: नव्वदोत्तरी मराठी कविता : कवी आणि कवितेची ऊर्जास्थळे –डॉ. किशोर सानप ०९
२. १९९० नंतरच्या मराठी कवितेतील सांविधानिक जाणिवा –प्रा.डॉ. आनंद गो. इंजेगावकर १७
३. भारतीय स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान सांगणारी नव्वदोत्तरी विद्रोही कविता : शिरःस्नाता– डॉ.मारोती कसाब २३
४. १९९० नंतरची लक्षवेधी ग्रामीण कविता– प्रा. डॉ. बाबूराव खंदारे २८
५. आंबेडकरी कवितेतील कृषिनिष्ठ जाणिवा– डॉ. अशोक रा. इंगळे ३४
६. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेतील वास्तव– प्रा. डॉ. गणेश क. टाले ४०
७. नव्वदोत्तरी आंबेडकरी नवकविता– प्रा. डॉ. संतोष हंकारे ४६
८. जागतिकीकरणाचा नव्वदोत्तरी ग्रामीण कवितेवरील प्रभाव– डॉ. आनंद भंडारे ५१
९. नव्वदोत्तरी आदिवासी कविता – डॉ.वैजनाथ अनमुलवाड ५४
१०. शोषणाविरुद्ध बंड आणि परिवर्तनाच्या जाणिवेची ग्रामीण कविता – डॉ. माधव जाधव ५९
११. जागतिकीकरणानंतरची बदलती मराठी कविता – प्रा. रामदिनेवार गोविंद शंकरराव ६४
१२. नव्वदोत्तरी मराठी कविता – प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे ६८
१३. नव्वदोत्तरी मराठी दलित कवितेचा नवा आविष्कार : टाचाटिभा – प्रा.डॉ.संजय बन्सीधरराव कसाब ७२
१४. मराठी कवितेतील महानगरीय संवेदनांचे अविष्करण – प्रा. डॉ. दादाराव गुंडरे ७८
१५. माणूसद्रोही व वर्तन–निष्ठाद्रोही वास्तवाचं आक्रंदन करणारी आंबेडकरवादी कविता : 'युद्ध अटळ आहे' – प्रा.डॉ.भारत कचरे ८३
१६. नव्वदोत्तरी आदिवासी कवितेतील भूक आणि भाकर – प्रा.डॉ.राजेश धनजकर ८८
१७. मराठी कविता : विशेष संदर्भ 'आता क्रांती दूर नाही' – प्रा. डॉ. डिगोळे बी.व्ही. ९४
१८. १९९० नंतरची दलित कविता : जागतिकीकरणाचा प्रभाव – प्रा. सूर्यवंशी संगीता ९९
१९. जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेल्या नव्वदोत्तरी मराठी कवितेतील 'निषेध–सुरांचे' मनोविश्लेषण – प्रा. डॉ. प्रदीप राऊत १०४
२०. कृषिजीवनाचे कलात्मक चित्रण– 'धग असतेच आसपास' – डॉ.नानासाहेब सूर्यवंशी १०७
२१. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेतील अनुभवविश्वाचे स्वरूपविशेष –डॉ. कमलाकर चव्हाण ११२
२२. १९९० नंतरच्या मराठी–हिन्दी कवितेचा तौलनिक अभ्यास : काही निरीक्षणे – डॉ. विश्वाधार देशमुख ११८
२३. उलगुलान या कवितासंग्रहातील आदिवासी स्त्रीरुपे – डॉ. संगीता ग. घुगे १२५
२४. नव्वदोत्तरी मराठवाड्यातील बालकविता एक दृष्टिक्षेप –प्रा.गजानन आनंता देवकर १३०
२५. नव्वदोत्तर ग्रामीण कवितेवरील जागतिकीकरणाचा प्रभाव (विशेष संदर्भ – इंद्रजित भालेरावांची कविता)
– डॉ. रवींद्र वैजनाथराव बेंबरे १३४
२६. नव्वदोत्तरी मराठी कवितेवर पडलेला जागतिकीकरणाचा प्रभाव – डॉ. शंकर विभुते १३९
२७. १९९० नंतरच्या ग्रामीण कवितेवर जागतिकीकरणाचा प्रभाव – प्रा.डॉ. अक्षय किशोर घोरपडे १४४
२८. १९९० नंतरच्या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कविता विशेष संदर्भ : दि.पु.चित्रे, ना.धों.महानोर
– डॉ.संजीवकुमार व्ही.पांचाळ १४७
२९. मराठवाड्यातील नव्वदोत्तरी कवितेतील स्त्रीवादी जाणीव – प्रा.डॉ.संध्या जाधव १५२
३०. नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेतील महीत्त्वाचा दस्तऐवज : नामदेव शेतकरी – प्रा. डॉ. अनिल काळबांडे १५६
३१. भुजंग मेश्राम यांच्या गोंडी कवितेच्या मराठी अनुवादातून घेतलेला मूल्यशोध –प्रा.डॉ.दीपक चिद्दरवार १६१
३२. नव्वदोत्तरी कविता आणि प्रतिमा विशेष संदर्भ : कोरडे नक्षत्र – डॉ. कापसे शिवसांब १६६
३३. सशक्त ग्रामीण अनुभूतीची कविता : 'पेरा' आणि 'टाहो' – प्रा. डॉ. संभाजी जाधव १७०
३४. नव्वदोत्तरी दलित कवितेतील इहवादी दृष्टिकोन (विशेष संदर्भ : 'बाकी सर्व ठीक आहे') –प्रा. डॉ. व्यंकटी पावडे १७४
३५. ''नव्वदोत्तरी मराठी आदिवासी कवितेची परितर्वनवादी वाटचाल संदर्भ : पाखरं, लेखणीच्या तलवारी व मी तोडले तुरुंगाचे दार''
– प्रा.डॉ.अटकोरे मंगेश तोलाजीराव १७८




Scanned with OKEN Scanner

# मराठी कवितेतील महानगरीय संवेदनांचे अविष्करण

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**
मराठी विभाग प्रमुख
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब, जि. उस्मानाबाद

मराठी कविता ही कालानुरूप अनेक अंगांनी विकसीत होत गेली. नव्या जाणीवा कवितेतून अवतरल्या व कवितेची कक्षा विस्तृत झाली. नवा आशय, नव्या अविष्कार पद्धती आल्या. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पर्यावरणाला कवेत घेणारी कविता त्या-त्या-काळाचे प्रतिनिधीत्व करताना दिसते. महानगरीय जीवन जाणिवांचा मराठी कवितेतून घडणारा अविष्कार लक्षात घेता स्वातंत्र्योत्तर काळातील कवितेच्या विकासाच्या वाटचालीतील लघु नियतकालीकांच्या चळवळीची प्रारंभी नोंद घ्यावी लागते.

मर्ढेकरांच्या काळापासून वास्तवचित्रणाकडे कवीचा कल अधिक झुकला. या अनुभवविश्वात मुंबईला विशेष महत्व आहे. मुंबईच्या जीवनातील वेगवेगळ्या स्तरातील जीवनांचा वेध अनेक कवी घेतात. या शहरातील गर्दी, धकाधकीत दिसणारे मानवी अस्तित्वाचे रूप न्याहाळताना दिसतात. यामध्ये प्रारंभी बा. सी. मर्ढेकर, दि. पु. चित्रे, वसंत आबाजी डहाके, अरूण कोलटकर, मनोहर ओक यांसारख्या कवींचा समावेश होतो. बा. सी. मर्ढेकरांनी 'मी एक मुंगी । तो एक मुंगी, तू एक मुंगी' या प्रतिमेतून मुंबई शहरातील माणसाबद्दलचे एक विशिष्ट वास्तव उल्लेखिले आहे. मनोहर ओकसारखा कवी महानगरीय संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करताना 'मुंबई' या कवितेत मुंबईसारख्या विराट नगरीतील अधोजीवनाचे फार प्रत्ययकारी वर्णन करतात.

'मुंबई मुंबई मुंबई । एक नागरी नखुरड उगवलेलं नशीबवान । एक जहर-जहर-निभ्रांत' अशा ओळीतून मुंबई वर्णनाचा प्रारंभ करून अठरापगड जातीच्या गोधडी बाजारापासून ते अनेक रंग-रूप-गंधात आपली सुपीकता विखुरणाऱ्या आलेले जोपासून वाढणाऱ्या मुंबईचे समरसून वर्णन करतात. थोडक्यात मुंबईसारख्या महानगरीय संवेदनांचा अविष्कार प्रारंभीच्या काळात भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, तुलसी परब, गुरूनाथ धुरी, चंद्रकांत खोत, प्रभा गणोरकर, आरती प्रभू, सतीश काळसेकर यांसारख्या कवींच्या लेखनात कमी अधिक प्रमाणात पहावयास मिळतो.

प्रस्तुत शोधनिबंधातून १९९० नंतरच्या मराठी कवितेतील महानगरीय संवेदनांचा अविष्कार विचारात घ्यावयाचा आहे. तो घेण्यापूर्वी महानगरीय जीवन जाणिवाचे पडसाद नवकवितेच्या टप्प्यापासून उमटलेले दिसतात. 'महानगर' हा विषय अनेक कवींचा दर्शनबिंदू राहिलेला आहे. असुरक्षितता, अनिश्चितता, भीती, अशाश्वतता, अस्थिरता यांनी महानगर आकाराला आल्याचे चित्र प्रारंभीच्या कवितेत दिसते.

धगधगत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक वास्तवाला अविष्कृत करणारी कविता १९९० नंतरच्या कवितेत तीव्रतेने दिसते. कारण १९९० नंतर आलेल्या खाऊजाने जो मूल्यव्यवस्थेचा, सामाजिक, राजकीय पर्यावरणावर जो अंतर्बाह्य परिणाम केला तो यानंतरच्या कवितेने टिपला. जागतिकीकरणाचे वारे जगभर पसरत असताना ते भारतात मात्र १९९० च्या दशकात पोहोचले. या सुरु झालेल्या जागतिकीकरणाच्या वाऱ्याने चक्रीवादळाचे रूप घेतलेले दिसते. त्यामुळे जागतिकीकरण ही संकल्पना जरी आर्थिक संदर्भाने विचारात घेतली जात असली तरी तिचा संबंध साहित्य कलेशीही आहे. सर्वंकष मानवी जीवनावर प्रभाव टाकणारी ही प्रक्रिया साहित्यविश्वातील मराठी कवितेलाही प्रभावशाली बनवते. जागतिकीकरणातील मराठी कवितेत महानगरीय जाणीवा कशा व्यक्त झाल्या, महानगरीय संवेदनशीलतेचे अविष्करण कसे झाले, त्याचे नेमके स्वरूप कसे दिसते. याचा शोध घेताना काही प्रतिनिधीक कवींच्या कविता समोर येतात.



Scanned with OKEN Scanner

महानगरीय जीवनामध्ये वास्तव्य करणारा कवी महानगरीय जाणीवेशी मोठ्या ताकदीने समरस होऊ शकतो. कारण महानगरीय जीवन जगल्याने, त्याकडे डोळसपणे पाहिल्याने महानगरीय संवेदना अधिक समर्थपणे चित्रीत करतो. केवळ कवितेत महानगरीय शब्दरचना मोठ्या संख्येने आली म्हणजे ती कविता महानगरीय होत नाही तर त्या कवितेत महानगरीय जीवनाचे जाणीवासह प्रतिबिंब उमटणे गरजेचे असते. याबद्दल म्हणूनच वसंत पाटणकर म्हणतात, ''महानगरातींल विशिष्ट परिस्थितीमूळे येथे दीर्घकाळ वास्तव्य माणसांची मानसिक घडण बदलते. या विशिष्ट मानसिक घडणीलाच आपण महानगरीय संवेदना म्हणतो.'' हा विचार महत्त्वपूर्ण वाटतो.

मराठवाड्यातील एक महत्त्वपूर्ण समीक्षक, परिवर्तनवादी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते, कवी ऋषीकेश कांबळे यांची 'कविता शहराची' ही एक महत्त्वपूर्ण कविता. या कवितेतून कवीने शहरातील माणसाच्या जगण्याची घुसमट चित्रीत केली आहे. नव्या शतकात ज्ञान–विज्ञानाने मोठी प्रगती केली. माणसाचा भौतिक विकास झाला. असे असले तरी माणूस माणूसकीला पारखा झाला आहे. माणसाच्या संवेदनाच बोथट झाल्या आहेत. परस्परावरील विाास उडालेला आहे. विकासाने माणूस माणसाच्या जवळ आला पण मनाने मात्र दूर गेला. इतरांच्या सुखदु:खाशी काहीच देणेघेणे नाही. केवळं स्वत:पुरतं बघण्याची बोथट प्रवृत्ती शहरात पहायला मिळते. हेच जणू शहराला प्रिय असते. म्हणूनच कवी अशी संवेदनाहीन माणसे ही या शहराची जणू शोकांतिकाच असल्याचे नमूद करताना म्हणतो,

''सखे, ह्या शहराची रीत न्यारी आहे
उलटे काळीज बंद कप्पे ह्या शहराला प्यारी आहे''

अशा शब्दातून महानगरातील संवेदना हरवलेली माणसे व तेथील शेती व्यवहार कवी मांडतो.

शहरात लख्ख प्रकाश असला तरी रात्रीने त्यास वेढलेले असते. वरून जरी झगमगाट दिसत असला तरी महानगरीय माणसे दु:खाने खंगलेली असतात. दु:खितांची, वेदनांनी विव्हळणाऱ्या माणसांची व दारिद्र्याने पिचलेल्या उपेक्षितांची वस्ती म्हणजे शहर असे कवीला वाटते. शहराचा बाह्य डोलारा कितीही आकर्षक असला तरी एक प्रकारची घुसमटच असते. विविध क्षेत्रात स्थित्यंतरे झाली असली तरी एक २१ व्या शतकात पाऊल ठेवलेल्या माणसापुढे स्वत:च्या अस्तित्वाचेच आव्हान उभे टाकलेले दिसते. कारण निसर्गातील असमतोल, प्रदुषण, नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास, मानवाची यंत्रशरणता इत्यादीमुळे भयंकर विनाश आज महानगरात होत  आहे. हे नमूद करताना कवी म्हणतात,

''आतल्या आत धुमसणारे
शहर सारे कण्हणारे
थोडेसे मोकळे, बाकी सारी शिरजोरी आहे''

महानगरावर दंगली, बॉम्बस्फोट अशा दहशतीचे सावट नेहमीचेच आहे. म्हणून सर्व शहर जणू कण्हत असल्याचे, वरून मोकळेपणा दिसत असला तरी आतून घुसमटच असल्याचे सांगतात. भारतीय समाजव्यवस्थेत विशेषत: महानगरात मोठी आर्थीक विषमता असते. आजही एक वर्ग भूकेसाठी इज्जत गहाण ठेवून वणवण फिरतो आहे. यांच्या जीवनास अंधार व्यापतो आहे. अशा अंधारमय जगात भूकेलेल्यांचे हुंदके आकार घेतात. उलटे काळीज बंद कप्पे असणाऱ्या या शहरात ठिबकणारे दु:ख इथे प्रत्येकाच्या दारी आहे. असे शहरातील सामान्य माणसाचे दु:ख कवी अभिव्यक्त करताना दिसतो.

जागतिकीकरणाने सर्वच बाबतीत आमुलाग्र बदल होत आहे. या नव्या पर्यावरणात संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे. मानवी संवेदना रोबोटमध्ये बदलत आहेत. एकूण मानवाचे भावविच बदलून गेले असून याची नोंद कवी सुनील अवचार कवितेतून टिपताना म्हणतात,

Scanned with OKEN Scanner

''या ग्लोबल वर्तमानात
भावना झाली आहे जाहिरात
आणि
मेंदूचे झाले आहे कम्प्युटर
तत्वज्ञान झाले आहे यूज अँड थ्रो
संस्कृती झाली आहे रखेल''

महानगरीय जाणीवा बदलल्याने मानवी भावनेस किंमतच राहिली नाही. एक प्रकारे मानवी भावनेस जाहिरातीचे स्वरूप आलेले दिसते. मानवी मेंदू कम्प्युटरप्रमाणे वागताना दिसतो आहे. त्यामुळे अशा मेंदूतून प्रसुत झालेले तत्त्वज्ञान 'युज अँड थ्रो' वाटू लागले आहे. अशा तत्वज्ञानास पाया नाही. हे तत्वज्ञान संस्कृतीची योग्य जडणघडण करण्याऐवजी विकृतीच निर्माण करते आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. असे कवीस वाटते. ही संस्कृती बहुराष्ट्रीय कंपन्यांची रखेल झाली आहे असे वाटते.

महानगरीय संवेदना बोथट झाल्याने कुणाला कशाशीही सोयरसूतक नसल्याचे कवी लक्षात आणून देतो. बदलत्या महानगरीय पर्यावरणाने आदर्शाची संकल्पनाच बदलून गेली आहे. आपण आयडॉल कोण असावा अशा द्विधा मनस्थितीत पोहचलेली नवी पिढी दिसते आहे. कवी सुनील अवचार महानगरीय जीवन साकारताना कवी कॉमन मॅनना उभं करतो. अगतिकपणे जीवन जगणारा हा कॉमन मॅन आपल्या जीवनातला अंधःकार नष्ट होईन या आशेवरती जगतो पण हा आशावाद फोल ठरतो. ही जाणीव 'धाब्यावरच्या वेटरची स्थिती नाही बेटर' या कवितेतून व्यक्त करतो. महानगरातील सामान्य माणसाच्या श्रमाला, प्रश्नाला महत्वच दिले जात नाही. तो उपेक्षितच राहतो.

कवी पी. विठ्ठल यांनीही आपल्या कवितेतून महानगरीय जीवनाचा आलेख साकारला आहे. ते शहर म्हणजे कोणताच आवेश नसलेला बधीर संवेदनांचा मुर्दाड प्रदेश म्हणतात. जो प्रदेश म्हणजे यंत्रवत, माणूसकीहीन अन मन नसलेला जणू इलाखाच असतो. इथे गगनचुबी इमारती, झळाळती रोषणाई असते पण दीन, दुःखितांना, अनाथांना आधार देणारी आई मिळत नाही. एक बेपर्वाइच वाट्यास येते. मन, नाते, माणूसकी इथे पोरकी झालेली असतात. भाकरीचं दुःख, भूकेने व्याकुळ झालेल्यांचे हाल या शहरास कळत नाहीत. श्रीमंतीचे मोठे गरोदर रूप या शहराने धारण केलेले दिसते. जिथे विषमता पहायला मिळते. हे शहर ध्वनी, हवा प्रदुषणाच्या विळख्यात सापडते. विविध प्रकारच्या जातीय, धार्मिक दंगलीची कीड या शहरास लागलेली दिसते. त्यामुळे धार्मिक स्थळांच्या ठिकाणाहून कानी पडणारा बांगचा आवाजही या महानगरातल्या माणसाला घाबरून सोडतो. पुरते हादरून गेलेले, नेहमी मृत्यूची टांगती तलवार असल्यासारखे जीव मुठीत घेऊन जीवन जगतात. वाढत्या शहरीकरणाचा, नव्या महानगरीय जीवनाचा वेध घेताना कवी पी. विठ्ठल 'शहरः सात संदर्भ' कवितेत म्हणतात,

''आधुनिकतेच्या माजापुढे
परंपरेनेच लाज टाकली
म्हणून तर हे शहर
वर्षानुवर्षे जगत आहे
पापपुण्याला फळवत आहे''

अशा शब्दातून यंत्रवत, माणुसकीहीन, संस्कृतीचे नागवेपण आणि भेदरलेलं आयुष्य जगणाऱ्या शहराचा वेध घेतात.



Scanned with OKEN Scanner

कवी मंगेश काळे यांनी 'शक्तीपाताचे सूत्र' व 'नाळ तुटल्या प्रथम पुरूषाचे दृष्टांत' या काव्यसंग्रहातून महानगरीय जीवनाचे दर्शन घडवले आहे. महानगरातील माणसे जीव मुठीत घेऊन, असुरक्षित, अशाात अशा स्वरूपाचे जीवन कंठताना दिसतात. कारण इथे नेहमीच गोळीबार, बॉम्बस्फोट, दंगलीसारख्या घटना घडून येतात. संकटकाळी बाहेर पडण्यासाठी बस, रेल्वेसारखी संकट्कालीन खिडकी या शहराला असत नाही. ही चिंता मंगेश काळे 'एका संकटकाळी बाहेर पडण्याच्या खिडकीजवळ' या कवितेतून प्रकट करतात.

''नि ज्या घरात किंवा प्रवासात
संकटकालीन खिडकी नसते
त्याच घरात प्रवासात
संकटात असलेले लोक राहतात''

एकदा का अशा शहररूपी जंजाळात माणूस अडकला की त्याची सुटकाच नाही. ते मानवी जीवनास घट्ट पकडून ठेवते. त्यामुळे महानगरीय संकटकालीन खिडकी उघडणे, त्यातून सुखरूप सुटका होणे खूप कष्टप्रद आहे. त्यामुळे पावलागणीस संकटाचा सामना करीत गरजेपोटी विनातक्रार जीवन जगतात. कवी अरूण काळे यांनी आपल्या 'सायरनचे शहर, नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातून महानगरीय जाणीवा प्रकट केल्या आहेत. ग्रामीण जीवन व महानगरीय जाणीवातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात,

''माझ्या लहानपणी सगळी संध्याकाळ
गोळा होई जेवणाभोवती
चूल आणि दिव्याच्या उजेडाची तिरीप धरून
उभं असायचं दारात एखादं कुत्रं हमखास
आई त्याला 'खंडेराव' म्हणायची
अर्धी भाकर सर्वांच्या आधी
त्याला मिळायची
आता लोक अन्न खूपच फेकतात
आणि दारंही कायम बंद ठेवतात
असल्या दारांसमोर कुत्रंही उभं नसतं''

बदलत्या समाज वास्तवाची घेतलेली नोंद अत्यंत बोलकी आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीने संपूर्ण जग जवळ आले पण माणसे माणसापासून दूर जाऊ लागली, मानवी संवेदना बोथट होऊ लागल्या. याचा अधिक प्रभाव महानगरीय जीवनावर झाल्याचे कवी उत्तम कांबळे आपल्या 'जागतिकीकरणात माझी कविता' मधून सांगतात.

''सारं जग जवळ आलंय म्हणतात
पण माणसं माणसांपासून
दूर धावताहेत
रोबोटच्या गळ्यात
गळा घालताहेत
माणसाऐवजी कुत्र्यांवर

Scanned with OKEN Scanner

कुत्र्यांऐवजी यंत्रावर
विास टाकताहेत''

अशा शब्दातून महानगरीय जीवनाची मर्यादा स्पष्ट करतात.

महानगरीय संवेदनाचे अविष्करण करणाऱ्या कवितेत काही सकारात्मकता अनुभवास येते. कवी धम्मपाल रत्नाकर 'हॉटेल माझा देश' कवितेतून हा अनुभव साकारतात. महानगरीय जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या हॉटेल संस्कृतीचे दर्शन घडवताना याचा प्रत्यय येतो. ही संस्कृती धर्म, पंथ, भाषा असे कांहीही पाहत नाही, भेद न करता सर्वांना धर्मनिरपेक्षतेने सामावून घेते. इथे महानगराचे व्यापकत्व निराळेच जाणवते. याशिवाय १९९० नंतरच्या कालखंडात महानगरीय जीवन जाणीवांचा उत्कट अविष्कार घडविणाऱ्या कवितेत महेंद्र भवरे, श्रीकृष्ण राऊत, प्रज्ञा लोखंडे, हेमंत दिवटे, संजीव खांडेकर, सलील वाघ, सचिन केतकर, अविनाश गायकवाड, भूजंग मेश्राम, संतोष पवार, दासू वैद्य, रोहन नागदिवे, मल्लिका अमर शेख यांचा समावेश होतो. ज्यातून महानगरीय जीवनाचे एक अकल्पित रूप समोर येताना दिसते.

**निष्कर्ष :** महानगरीय संवेदनांची विविध रूपे किंवा महानगर हा विषय नवकवितेच्या कालखंडापासून प्रामुख्याने पहावयास मिळतो. एक प्रकारची निरर्थकता, सर्वव्यापक अर्थशुन्यता, अस्थिरता, अनिश्चितता यातून आकारास येते. हे शहर ओझी लादते व बांडगुळासारखे माणसाचे सत्व शोषून घेते. असा अनुभव येतो. नवदोत्तरी कालखंडात लिहिल्या जात असलेल्या समकालीन कवितेला अन्य संदर्भासह जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ आहे. समकाळात घडून गेलेल्या ताज्या महानगरीय घडामोडींचा संदर्भ आहे. या नव्या पर्यावरणात माणसाची भावना, संवेदना, विचार करण्याची शैली, जीवनविषयक दृष्टी, नात्याबद्दलची दृष्टी एकूणच सर्वच बाबतीत बदललेला दृष्टीकोन यात आमुलाग्र बदल झाला आहे. संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे आणि मानवी संवेदना रोबोटमध्ये बदलत आहेत. बदलत्या महानगरीय जीवनाचे समाज वास्तव शब्दाच्या चिमटीत पकडण्याची ताकद समकालीन कवितेत आहे. आधुनिक माणसाचे जगणे मरणे आता अटळपणे या शहराशी बांधले गेले आहे. याची प्रचिती या जाणीवेत आहे. पारंपारिक संस्कृतीच्या मुळीतून जगण्याची स्वाभाविक प्रवृत्ती आणि लय होती तीच गमावून बसत आहोत. चंगळवादाच्या आहारी गेल्याने कंगालीकरण होत आहे. माणसाचे संघर्षमय, बेगडी, माणूसकीशुन्य जगणे कवीला अस्वस्थ करते. शिवाय महासत्तेत येण्यासाठी वाढते शहरीकरण, त्यातून होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, सुविधांवर होणारा दुष्परीणाम असा पट पुढे सरकत जातो. आजच्या उघड्या वर्तमानाचा परिणाम एकंदर विविध कलाप्रकाराप्रमाणे कवितेवरही झाली. महानगरीय भ्रष्ट संस्कृतीचे, विद्रुप वास्तवाचे दर्शन घडते. शहरातल्या माणसाच्या जगण्याची घुसमट व्यक्त करणारी ही कविता चिंतनात्मक ठरते. महानगरीय चढ–उतार, महानगरीय वेदना–संवेदनांचे अक्राळविक्राळ रूप ही कविता साकारते. शहरी संस्कृतीतील बदल, समाजवास्तव माणसाला वस्तुरूप देताना दिसते. संस्कृतीचे बाजारीकरण, जीवनात असुरक्षितता, स्वकेंद्री, स्वार्थीवृत्ती व सर्वात महत्त्वाचा परिणाम सर्वसामान्य माणसांची होणारी घुसमट, पिळवणूक होताना दिसते. ही सर्व मांडणी भाषेच्या, प्रतिमेच्या, अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी कवितेत मोलाची भर टाकणारी आहे. अशा प्रकारे महानगरीय पर्यावरणाचा अनुभव, महानगरीय संवेदनेचा अविष्कार मराठी कवितेत विशेषत: जागतिकीकरणाच्या प्रभावक्षेत्रातून प्रकटलेल्या कवितेतून दृष्टीस पडतो.

**संदर्भ :**

१) (संपा.) मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद, 'साहित्य चिंतन', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती एप्रिल २००८.
२) (संपा.) डॉ. शरद गायकवाड, प्रा. सुनील शिंदे, 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १७ ऑक्टोबर २००९.
३) (संपा.) डॉ. मा. मा. जाधव, 'अक्षरगाथा' (त्रैमासिक), बळीवंश प्रकाशन, नांदेड, वर्ष दुसरे / अंक तिसरा १० ऑक्टोबर २०११.
४) 'प्रतिष्ठान' (मराठवाडा साहित्य विशेषांक), मार्च–एप्रिल–मे–जून २००८.
५) डॉ. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९९.

(11)

# हाशिए का समाज और हिंदी-मराठी साहित्य



संपादक

डॉ. सतीश यादव  डॉ. रणजीत जाधव
डॉ. संतोष कुलकर्णी  प्रा. अमोल इंगळे

Scanned with OKEN Scanner

# आदिवासी लोकगीतातील स्त्री जाणीवा

डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जि. उस्मानाबाद
ई-मेल - deepaks2021@gmail.com
मो. 9420958699

---

**प्रास्ताविक :**

आदिवासी साहित्याचा एक स्वतंत्र प्रवाह म्हणून साहित्यातून समोर येताना दिसत आहे. त्याचा एक परिपाक म्हणून साहित्यसंमेलने भरत आहेत. पदवी-पदव्युत्तर, चर्चा-परिसंवाद, सभा तसेच नवसाहित्य म्हणून नव्या जाणीवेतून या साहित्याला त्याची अस्मिता प्राप्त होत आहे. १९७९ पहिले आदिवासी साहित्य संमेलन भद्रावती जि. चंद्रपूर येथे संपन्न झाले. एक दिशा व्यासपीठ व साहित्याला प्रोत्साहन देण्याचे काम डॉ. विनायक तुमराम यांनी केले. त्याचबरोबर नजूबाई गावीत, केशव मेश्राम, भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, बिरसा मुंडा, कुंडलिक केदार, चामुलाल राठवा, डॉ. तुकाराम रोंगटे, रामराजे आत्राम आदिनी साहित्याचा प्रसार व प्रचारासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. भारतात आदिवासींची संख्या लक्षणीय असून महाराष्ट्रात जवळपास ४५ लक्ष एवढी आहे. यात भिल्ल, गडवी, पावरा, गोंड, कातकरी, वारली, ठाकर, पारधी, आंध, कोळी, कोरकू, मावची, कोलाम, माडीया इ. प्रमुख जमाती आढळतात. आदिवासी साहित्य आज जगामध्ये ९० भाषांमध्ये उपलब्ध आहे हे एक वेगळेपण आपणास दिसते.

आदि + वासी = मूळनिवासी

महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्ह्यांपैकी जवळपास २२ जिल्ह्यामध्ये आदिवासी जाती व जमाती आढळतात. नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, अमरावती, भंडारा, नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड, अहमदनगर व नांदेड.

**निर्मितीच्या प्रेरणा :** स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक चळवळी झाल्या. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हक्क व कर्तव्याची जाणीव करून दिली. आदिवासी साहित्याला प्रमुख प्रेरणा मिळाली. शिक्षणातून परिवर्तन होऊन आदिवासी समाज प्राचीन संस्कृती, समाजप्रबोधन, लोककथा, प्रथा, परंपरा यांचे जतन करत विविध क्षेत्रात आपले स्थान निश्चित करताना दिसत आहे. आदिवासी साहित्य प्रेरणामध्ये साहित्यिकांनी बिरसा मुंडा, म. जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महत्वाचे आहेत.

**शोधनिबंध संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधात प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा [illegible] त्याचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक, समाजशास्त्रीय, वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक संशोधनपद्धतीचा वापर केला आहे. [illegible] संकेतस्थळ, नियतकालिके, संदर्भग्रंथ, शासकीय लेख व वैचारिक लेखांचा उपयोग करून शोधनिबंध लेखन केला आहे.

**संकल्पना, स्वरूप व व्याख्या :**

- जन्माने आदिवासी असलेल्या लेखकाने आदिवासी संस्कृतीशी [illegible] साहित्य लिहिले ते साहित्य, आदिवासींच्या



Scanned with OKEN Scanner

जीवनावर भाष्य करणारे इतरांनी लिहिलेले, तसेच आदिवासीच्या बोलीभाषेतील लोकसाहित्य होय.

- डॉ. सौ. शैलजा देवगावकर

- आदिवासी संस्कृती ज्या साहित्यात प्रतिबिंबीत होते अशा लिखीत व अलिखीत साहित्याला आदिवासी साहित्य म्हणतात. यात गाणी, कथा, म्हणी, नृत्य, चित्रकला यांचा समावेश होतो.

- डॉ. सौ. लता छत्रे

- केवळ आदिवासींनीच लिहीलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य नव्हे तर आदिवासींच्या सांस्कृतिक मूल्यांसकट त्यांचे सर्वांगिण हित जपणारे जे जे प्रतिभावान असतील त्या सर्वांनी लिहीलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

- डॉ. विनायक तुमराम

- पशुपालक जगात, पशुपुजक जगात, पहाडी-जंगली जगात, प्राचीन गिरीजन म्हणजे आदिवासी व त्यांच्यावर आधारलेले साहित्य.

- डॉ. सुदाम जाधव

- आदिवासी संदर्भातील भौगोलिक, सामाजिक, वांशिक व धार्मिक प्रथकतेची जाणीव व्यक्त करणाऱ्या मराठी साहित्यास आदिवासी साहित्य म्हणतात.

- प्रमोद मुनघाटे

- एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या स्थानिक गटाच्या समूहाला आदिवासी तर यांच्यावर आधारित साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

- गिलीन व गीलीन

- आदिवासी साहित्य ह्दयातून झिरपते व ह्दयापर्यंत पोहोचते, मानवी जीवन फुलवते, सजवते आणि सुंदर करते ते साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

- वाहरू सोनवणे

एकूणच आदिवासी साहित्य हे मूळ जनाचे प्रतिनिधीत्व असणारे साहित्य आहे. यामध्ये त्यांचे लोकजीवन हे आधारलेले दिसते. साहित्य, मौखिक परंपरेने जतन व संवर्धन केले जाते. निसर्ग, संस्कृती, इतिहास, समाज व नैतिक परंपरांचा परिचय या साहित्यातून त्यांच्या जातीजमातीनुसार वेगळेपणासह प्रकट होतात.

स्त्रियांच्या जीवनाची त्यांच्या लोकगीतातून अनेक भावना व्यक्त होतात. त्यांचे निसर्गाशी असलेले सानिध्य अजरामर आहे. एके ठिकाणी असा उल्लेख -

*बामणाच्या जन्माला जाशील, लिखून लिखून मरशील*
*मारवाडी होशील, तोलून तोलून मरशील*
*चमार होशील, तर नाड्या जोती करून मरशील*
*पर वारल्याच्या जन्माला जाशील तर जंगलाचा राजा होशील*

असे गीतातून आले आहे.

परंपरागत लोकगीतांचा अविष्कार निसर्गातील स्वच्छंदपणा, मुक्तपणा, निर्झर व वाऱ्याप्रमाणे वाहणारे आहे. भारतीय समाज संस्कृतीत स्त्रीयांचे भावविश्व या साहित्यातून पर्यायाने लोकगीतातून अवतरते. या आदिवासी लोकगीतात स्त्रीजीवन वेगळ्या पद्धतीने साकारले आहे.

*नारी मायेचे रूप ते अनंत*



Scanned with OKEN Scanner

*हौस नटण्याची तिला जन्मजात*

आमची कन्या सुंदर, लक्ष्मी व दुर्गादेवीसारखी असून हुशार आहे. शिवाय ती दैनंदिन नित्यक्रमात व्यस्त असते. या संदर्भात तिची आई (कोलाम जमातीची) आपल्या मुलीच्या गुणाविषयी प्रशंसा करताना

*आम्मे पिलां कांडकाद*
*लक्ष्मी आणि दुर्गादेवी लांग कांडकाद*
*आम्मे पिलां कांडकाद*
*हुश्शार ते हुश्शार गिनी ओटवोल*
*ओलींग कांडकांद*

पूर्वी वयात आलेल्या मुलीचे लग्न वयोवृद्ध पुरूषाशी केले जायचे परंतु अशा वेळी धाडसाने आदिवासी तरूणी व्यक्तीस्वातंत्र्याला अनुसरून परंपरेला विरोध करते व वर निवडीविषयी धाडसाने आपल्या वडीलांना (माडीया जमातीची) उद्देशून म्हणते,

*ओ मेरे प्यारे पिता, न ब्याहो मुझे बुढे से*
*मेरे लिए पोहल ला दो*
*खिलाएगा मुझे*
*पहनाएगा उनी चोला*

या लोक गीतातून आपल्या वडीलासोबत आपल्या भावना व्यक्त करते. माझा विवाह म्हाताऱ्याशी करू नका, मेंढ्या पाळणारा पती बघा जो खाऊ घालेले व उनी कपडे घालायला देईल. तसेच प्रचलित भारतीय समाज व्यवस्थेमध्ये हुंडा पद्धती एखाद्या कर्करोगाप्रमाणे आहे. परंतु आदिवासी जाती जमातीमध्ये हुंडा पुरूषांना नाही तर वधुपित्यांना दिला जातो. शिवाय कर्तबगार पुरूषांना निवडीसाठी एखादे आव्हान दिले जाते. धान्य, पशु, विविध साहित्य दिल्याशिवाय तरूणांना मुलगी मिळत नाही. अगदी प्रेमविवाहात देखील ते दिले जाते. हे एक वेगळेपण आदिवासी जाती जमातीमध्ये आजही टिकून आहे.

*जोडी जोडी इनदाद, वंजी वाल वाल दादी, वंजी वाल वाल*
*पुण्यम जोडी दुर्रको दादी, वंजी वाल वाल दादी, वंजी वाल वाल*

नवरदेवाला आधी धान टाक, आणि मग नवरीला ने. नवरी फुकट मिळत नसते, प्रत्येकवेळी कष्टाला महत्व कसे आहे हे जणू स्पष्ट करण्याचा उद्देश यामागे दिसतो.

समस्त स्त्रियांच्या भावभावांचा अविष्कार, नातेसंबंधांना अनन्यसाधारण महत्व व परंपरेचा स्विकार (योग्य त्या) या बाबीला आदिवासी स्त्रियांच्या जीवनातही खूप महत्व आहे. जसे सासरी असताना दिवाळी सणासाठी माहेरची ओढ कशी असते यावर डांग जमातीची स्त्री मत व्यक्त करतांना एका लोकगीतातून -

*दिवाळीचा थाट ना, आई पाटील वाटान*
*राया माहेरी जाऊ द्या ना राया हो*
*भाऊ संदेकाळी आला मजला न्यायला*
*बसा नी पाणी प्या ना, जाऊ द्याना राया हो*

एकूणच आदिवासी साहित्य हे मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने संख्येच्या दृष्टीने कमी आहे. मात्र गुणवत्तेच्या बाबतीत निश्चितच अग्रेसर आहे.

अनेक आदिवासी जमातींमध्ये विविध सण समारंभ, लग्नप्रथा या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. असाच भिल्ल या आदिवासी जमातीत नवरा नवरी हळद लावताना, नवरीची पाठवणी करताना विशिष्ट प्रकारची गाणी गायली जातात. त्यातून त्यांची थट्टा

मस्करीही केली जाते. एकमेकांच्या भावभावना यामधून आविष्कृत होतात.

*हायी हळद कुटणी, हळद कुठणी*
*हायी चाळीसगावानी, हळद जलगावनी हळद*
*हाक हाळदना सांड हाळदना सांड*
*जावू देवानी दारान देवानी दारान*
*कोणता भाऊ नवरदेव कोणता भाऊ नवरदेव*

स्त्रियांच्या जीवनामध्ये मातृत्व हे महत्त्वाचे मानले जाते. वंशाला वारसदार हवा, शुरविरांची माता होण्याची अपेक्षा ती व्यक्त करते. अनेक संकट, गरीबी, दारिद्र्य असले तरीही आपल्या मुलाला झोपवताना कोरकू जमातीची स्त्री आपल्या अंगाईगीतातून

*सोने का झुला झुलाया*
*आँख का दिया, हाथ का पलना*
*और गोदी की पालकी*
*झुला झुलाया*

जंगल, वस्तीवर अधिवास असुनही काल्पनिक सोन्याच्या पाळण्यात झोपविले, डोळ्याचे दिवे लावले, हाताचा पाळणा केला, कडेवरची पालखी केली, बाळा तू आता शांत झोप अशी ममत्व भावना यात आहे. आदिवासी साहित्य हे १९६० नंतर प्रवाहित झालेले महत्वपूर्ण साहित्य आहे. आज प्राथमिक ते विद्यापीठीय व संशोधनपर अभ्यासक्रमामध्ये मोठा वाव या साहित्याला मिळत आहे.

**निष्कर्ष :**

आदिवासी मूलतः निसर्गावर निस्सीम प्रेम करतात. स्वतःला त्याचाच घटक मानतात. हा गुण शहरी संस्कृतीतील लोकांनी निसर्गावर प्रेम करण्यासाठी विचारात घेण्यासारखा आहे.

आदिवासी जमातीत स्त्री-पुरूष समानता हे तत्व असून स्त्रियावर अत्याचार होत नाहीत. एक प्रकारे सामाजिक न्यायाची भूमिका यामध्ये दिसते.

आदिवासी समाजात कष्ट हे भांडवल मानले जाते. मूळ भारतीय वंशज असून डोंगर, दरीत वास्तव्यास आहेत. शहरी जीवन पद्धती, संस्कृती यापासून ते कोसो मैल दूर आजही ते आहेत.

शिक्षण परिवर्तनाचे माध्यम झाल्याने त्याचे महत्व आदिवासी जमातीला पटले आहे. याचा परिणाम आदिवासी जमाती शिक्षणाच्या प्रवाहात येत आहेत व दर्जेदार साहित्य निर्मिती करत आहेत. खरेतर आदिवासी समाज आजही शासनाच्या योजनांपासून वंचीत आहे. परिणामी त्यांचा विकास करणे हे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१) डॉ. सौ. शैलजा देवगावकर, आदिवासी साहित्य आणि संस्कृती (संपा.), आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००७.

२) लता छत्रे, नवभारत वर्ष, अंक ६-७, मार्च ते एप्रिल २००५, आदिवासी साहित्य संस्कृती वाई.

३) डॉ. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य आणि परिवर्तन, सृजन त्रैमासिक जानेवारी ते मार्च २०१०, संपा. मा. मा. जाधव.

४) डॉ. सुदाम जाधव, आदिवासी साहित्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.


❋ ❋ ❋



Scanned with OKEN Scanner

# हाशिए का समाज और हिंदी-मराठी साहित्य



संपादक
डॉ. सतीश यादव डॉ. रणजीत जाधव
डॉ. संतोष कुलकर्णी प्रा. अमोल इंगळे

Scanned with OKEN Scanner

हाशिए का समाज और हिंदी - मराठी साहित्य
संपादक मंडल :- डॉ. सतीश यादव, डॉ. रणजीत जाधव,
डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. अमोल इंगळे

ISBN 978-93-5240-146-8

अरुणा प्रकाशन
103, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. 9421486935, 9421371757

© लातूर जिला हिंदी साहित्य परिषद, लातूर

: प्रथम आवृत्ति :- नवंबर 2017

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

शब्द संयोजन : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन :- विरु गुळवे 8600881127

मूल्य : 350.00 रुपये

*"हाशिए का समाज और हिंदी - मराठी साहित्य" इस स्मारिका में व्यक्त मतों से संपादक मंडल का सहमत होना जरूरी नहीं है।

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका

## खण्ड - ब (मराठी)

1. आठवणीतले शब्दरत्न डॉ. रणसुभे सर - **डॉ. रोहिणी पटवर्धन-सुरु / 267**

2. डॉ. सूर्यनारायण रणसुभे : व्यक्ती आणि लेखक - **प्रो. सौ. रमा प्र. नवले / 269**

3. संत तुकारामांचा समत्त्वभाव - **डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे / 272**

4. संत एकनाथांच्या भारूडातील परिघाबाहेरील समाजाचे चित्रण - **डॉ. बी. व्ही. डिगोळे / 276**

5. संत चोखोबांच्या अभंगातील समाजचिंतन - **प्रा. धिरजकुमार सत्येकाल कोतमे / 280**

6. सत्यशोधक यादवराव शिदोरे यांचे पद्यलेखन - **प्रा. डॉ. गोविंद काळे / 283**

7. 1960 नंतरच्या मराठी साहित्यात दलित हुंकार - **प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव / 287**

8. मराठी दलित कवितेतील हुंकार - **प्रा. डॉ. दादाराव गुंडरे / 290**

9. 1970 नंतरची आदिवासी कविता : दिशा आणि दर्शन - **डॉ. वैजनाथ अनमुलवाड / 295**

10. 1970 नंतरच्या मराठी साहित्यात स्त्री जीवनाचे वास्तव - **प्रा. डॉ. सी. एस. आवारे / 299**

11. आदिवासी लोकगीतातील स्त्री जाणीवा - **डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी / 302**

12. डॉ. सूर्यनारायण रणसुभे, अनुवाद कला आणि परिघाबाहेरील समाजाचे साहित्य:एक मागोवा - **दत्ता चव्हाण / 306**

13. एकोणिशे सत्तर नंतरच्या मराठी साहित्यातील भटक्या विमुक्तांचे चित्रण (विशेष संदर्भ - धनगर जमात) - **प्रा. डॉ. मारोती कोल्हे / 309**

14. अध्यात्म लोकशाहीच्या परिघाबाहेरील संत चोखा मेळा - **प्रा. प्रशांत बब्रुवान क्षीरसागर / 313**

15. ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांचा अनुबंध जपणारी शेतकरी संघटना - **प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत / 318**

16. जागतिकीकरणातील दलित कवितेच्या जाणिवा - **प्रा. गोविंद शंकरराव रामदिनेवार / 321**

17. 'चिखलवाटा' कादंबरीतील परिघाबाहेरील समाज - **प्रा. डॉ. जयद्रथ जाधव / 324**

18. दलितांच्या वर्तमान स्थितीगतीचा जिवंत अविष्कार 'सूर्यस्तूप' - **डॉ. लहू दिगंबर वाघमारे / 329**

19. जागतिकीकरण आणि दलित कवितेतील बदलते संदर्भ - **प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने / 336**

20. जगण्यासाठी लढण्याचे बळ देणारी : कोयता - **प्रा. डॉ. केशव आलगुले / 340**

21. कोल्हाट्याचं पोर : एक आकलन - **आरती केशवराव गायकवाड / 343**

Scanned with OKEN Scanner

# मराठी दलित कवितेतील हुंकार

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
जि. उस्मानाबाद

१९६० नंतर ठळकपणे मराठी साहित्य विश्वात काही साहित्य प्रवाह, चळवळी उदयास आल्या. त्यामध्ये ग्रामीण, स्त्रीवादी, ख्रिस्ती, जैन, आदिवासी, मुस्लिम, कामगार, जनवादी, बाल तसेच दलित साहित्य प्रवाहाचा समावेश होतो. इतर साहित्य प्रवाहाप्रमाणे स्वत्वाच्या जाणीवेने विस्तार पावलेला तसेच मराठी साहित्याचे दालन समृद्ध व संपन्न करणारा प्रवाह म्हणून दलित साहित्य महत्वाचे ठरते. हा प्रवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वविचारावर अधिष्ठित आहे. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा या प्रेरणेतून, बाबासाहेबांनी केलेले सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलनाने दलित समाजास आत्मभान आले. वर्षानुवर्षे अज्ञानाच्या काळ्याकुट्ट अंधारात चाचपडत पडलेला दलित समाज खडबडून जागा झाला. नवजागृत, नवशिक्षित लेखक कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याने मुख्यत: प्रेरित होऊन तसेच भगवान बुद्ध, महात्मा फुले व राजर्षी शाहु महाराज यांच्या जीवन कार्यास प्रेरणास्त्रोत मानून आपल्या जीवन जाणीवा शब्दबद्ध केल्या. दलित साहित्यकांनी आपल्या व्यथा, वेदना व जीवन जाणीवा साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून मांडण्यास प्रारंभ केला. त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, वैचारिक लेखन तसेच कविता या प्रकारांचे मौलिक योगदान आहे. यापैकी दलित कवींच्या कवितेतून प्रकटणारा हुंकार याचा परामर्श या शोधनिबंधातून घेण्याचा हेतु आहे.

दलित जीवन जाणीवा वास्तव अभिव्यक्तीतून प्रकट करणाऱ्या कवितेचा विचार करण्यापूर्वी दलित ही संकल्पना किती व्यापक किंवा तिचा मूळ आशय समोर ठेवणे महत्त्वाचे वाटते. दलित हा शब्द विशिष्ट समुहवाचक किंवा अस्पृश्य दलितापुरता मर्यादित नाही. तर ज्याच्यावरती अन्याय होतो तो दलित. ज्याची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व्यवस्थेने पिळवणूक केली तो दलित. ज्याला माणसाच्या अधिकाराने जगता आले नाही, ज्याच्या वाट्यास प्रतिष्ठेचे जीवन आले नाही उलट वंचित, उपेक्षित व अपमानित जीणे वाट्यास आले. अशा प्रकारच्या अन्याय अत्याचारास सामोरे गेलेल्या समुहाचे चित्रण करणारे साहित्य दलित साहित्य ठरते. दलित या संज्ञेचे स्पष्टीकरण डॉ. शिवदास शिरसाट यांनी 'दलित आत्मकथन : स्वरूप, संकल्पना व सौंदर्य' या पुस्तकात दिले आहे. डॉ. म. ना. वानखेडे, 'दलित' म्हणजे केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले गेले, श्रमजीवी आहेत ते सर्व दलित होत, भालचंद्र फडके दलित हा शब्द जातीवाचक किंवा मूल्यवाचकही नाही तर अनेक शतकानंतर ज्यांना आपले स्वत्व गवसले, बाबासाहेबांच्या मुक्तीच्या लढ्यातून ज्यांना अस्मिता लाभली त्या स्तरातील लेखन दलित पदातून व्यक्त होते. तसेच बाबुराव बागुल 'दलित' पदाचा पारंपारिक अर्थ नाकारून दलित म्हणजे क्रांतिप्रवण सम्यक परिवर्तन असा नवा अर्थ स्वीकारतात. यामधून दलित संकल्पनेची व्यापकता लक्षात येते.

दलित साहित्यात 'कविता' हा वाङ्मय प्रकार अगोदर उदयास आला. वेदनेच्या अभिव्यक्तीसाठी अनेकांना कविता जवळची वाटली. त्यामुळे अन्य वाङ्मय प्रकारापेक्षा दलित कविता अधिक प्रमाणात निर्माण झाली. दलित समाजाच्या वाट्यास आलेल्या व्यथा, वेदना, जीवन जाणीवा तसेच भयान वास्तवाचा अविष्कार काव्याद्वारे समर्थपणे घडविला. त्यामुळे दलित



Scanned with OKEN Scanner

साहित्यातील फार मोठी जागा दलित कवितेने व्यापलेली आहे. विद्रोह, नकार, वेदना, मानवता, विश्वात्मकता, विज्ञान अशा अनेक अंगांनी ती बहरली. हिरा बनसोडे, प्रतिभा अहिरे, प्रेरणा व्यवहारे, ज्योती लांजेवार, सुगंधा शेंडे, प्रज्ञा लोखंडे, मीना गजभिये, कुमूद पावडे, सरला ठमके यांसारख्या अनेक कवयित्रीबरोबर कवींनी दलित कवितेचा अविष्कार घडविला व तिला समृद्ध बनविले.

मराठी दलित कवितेचे स्वरूप लक्षात घेताना प्राचीन मराठी कवितेकडे नजर टाकली असता दलित जाणीवा दृष्टीस पडतात. दलित कवितेची परंपरा संत साहित्यात दिसते. वारकरी संप्रदायातील चोखामेळा, कर्ममेळा, बंका महार, संत जनाबाई यांच्या अभंगातून आपणास त्यांना समाजात सोसावे लागलेले दुःख,
ज्ञातीहिन असलेल्या वेदना जाणवतात. अस्पृश्य असणारी वेदना दिसते. ही वेदना उत्कट, व्याकुळ करणारी आहे.

*"जोहार मायबाप जोहार / तुमच्या महाराचा मी महार /*
*बहु भुकेला झाला / तुमच्या उष्ट्यासाठी आलो //"*

यासारख्या अभंगात अगतिकता आहे. दलित वेदनेचे आदिरूप संत चोखामेळा आहेत. हे अभंग दलित वेदनेचे प्राचीनत्व दाखवितात. शब्दातून झिरपणारे दुःख कारूण्याने भरलेले व वेदनेचे आहे. फरक एवढाच आहे की, यातील वेदना विद्रोही स्वरूपाची नाही तर त्यात करूणा आहे, लीनता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तीलढ्यातून प्रेरणा घेऊन किसन फागुजी बनसोडे, गोपाळकाका वलंगकर, वामनदादा कर्डक यांनीही दलितांच्या व्यथा, वेदना, आशा-आकांक्षा प्रकट केल्या.

साठोत्तरी दलित कवितेचे रूप अनेकांच्या कवितेतून प्रखरपणे जाणवते. यामध्ये लक्षणीय काव्यलेखन करणारे कवी नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, केशव मेश्राम यांचा समावेश होतो. नामदेव ढसाळांनी पारंपारिक कवितेला छेद देण्याचे काम केले. 'गोलपीठा, मुर्ख म्हताऱ्याने डोंगर हलविले, प्रियदर्शनी, 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य रात्र, तुही यत्तकंची, खेळ, गांडू बगीचा, या सत्तेत जीव रमत नाही' इत्यादी काव्यसंग्रहातून त्यांनी बंडखोरीचे व क्रांतीचे पाऊल उचललेले दिसते. यांची कविता अन्य कवींच्या कवितेपेक्षा वेगळी आहे. त्यांच्या कवितेतील जग चक्रावून सोडते. या कवितेतील जग हे पांढरपेशा जगाच्या सीमेपलीकडे सुरू होते. मुंबईतील गोलपीठा या नावाने ओळखले जाणारे हे जग आहे. अर्धपोटी किंवा रिकाम्या पोटाचे, मरणांच्या खस्ताचे, उद्याच्या चिंताचे, शरम व संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्यदेहांचे अशा जगात वाढलेल्या नामदेव ढसाळांनी जे भोगलं ते कवितेतून व्यक्त केलं. पांढरपेशा वर्गास निरूत्तर करणारे अनेक प्रश्न ते विचारतात. ते म्हणतात,

*"हे वाद्या! तू माणसालाच असे हीन केलेस*
*तुला वेशीबाहेरचा आक्रोश ऐकु आला नाही का?*
*पेटलेला माणूस दिसला नाही का?*
*उदासीनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही का?*
*वीजेचा लोळ वेशीची तटबंदी फोडून आत येतोयरे*
*सांग का देत नाही त्याला कडाडून मायेचे आलिंगन?"*

आपल्या सभोवतीची वास्तवता, भयानकता ते व्यक्त करतात. केवळ दाहक जीवन दाखवून देणे एवढाच त्यांचा हेतु नाही तर जगण्याचे हक्क मिळवू पाहणाऱ्या समाजाच्या मनातला धुमसत असणारा अंगार व्यक्त करायचा आहे. बुद्धी व भावनेस आव्हान करताना मानवतेचे गाणे गायलाही विसरत नाहीत.

स्वतंत्र भारतात सर्व दृष्टीने दलितांचा भ्रमनिरास झाला आहे. दलित समाजाचे मूळ दुःख नाहीसे झालेले नाही.



Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्यात माणुस निराश दिसतो. याची कडवट प्रतिक्रिया ऐकायला मिळते.

*"स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे?*
*रामराज्याच्या कितव्या घरात न्हातोत आपण?*
*उद्‌गम विकास, उंची संस्कार, संस्कृती कंचा, मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा?"*

असे प्रश्न ढसाळ विचारतात. ज्यामध्ये क्रांतीचा ध्यास आहे. संपूर्ण क्रांती म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रात क्रांती, या क्रांतील पिळवणूक, अपेक्षाभंग, अत्याचार यासारख्या प्रवृत्ती जन्म देतात अशी भावनाही ते व्यक्त करतात. आंबेडकरी विचारांना स्मरून 'शतकानंतर प्रकाशाची फुले हाती ठेवणारा फकीर भेटला आता सूर्योन्मुख झाले पाहिजे' ही भावना, कर्तव्य सांगायलाही ते कवितेतून विसरत नाहीत.

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गाचे दु:ख, त्याचे चटके प्रत्येक कवीच्या वाट्यास आलेले आहेत. या आत्मनिष्ठ अनुभवाची विद्रोहात्मक अभिव्यक्ती दलित कवितेचे स्वरूप राहिलेले आहे. म्हणून ती येथील समाजव्यवस्था, संस्कृतीस नकार देत संघर्षाचा पवित्रा घेताना दिसते. वेदना, विद्रोह व नकार ही दलित कवितेनेही आपली तत्वत्रयी मानली आहे. संघर्ष इष्ट असा बदल हवा आहे. त्यासाठी कांही कवी आक्रमक पवित्रा घेताना दिसतात. बाबुराव बागुल 'ज्यांनी चूक केली इथे जन्म होण्याची त्यांनीच ती सुधारली पाहिजे, देश सोडून अथवा भीषण युद्ध करून' असा विद्रोही सूर काढताना दिसतात. विद्रोही कवितेचा टणक हुंकार, शतकानुशतकाची भळभळती जखम कवितेतून वाहत राहते.

वामन निंबाळकरांनी 'गावकुसाबाहेरील कविता, महायुद्ध' या काव्यसंग्रहातून वाट्यास आलेले पशुपातळीवरील जीवन साकारले. मनातील विद्रोह शब्दांच्या मदतीने समर्पकपणे प्रकट केला. केशव मेश्राम यांनी 'उत्खनन, जुगलबंदी, अकस्मात व चरित्र', त्र्यंबक सपकाळे 'सुरूंग', प्रल्हाद चेंदवणकर 'ऑडीट', ज. वि. पवार 'नाकेबंदी', अर्जुन डांगळे 'छावणी हलते आहे', नरेशकुमार इंगळे 'अंगारा' यासारख्या काव्यसंग्रहातून जीवनात आलेल्या रूक्ष, कडवट अनुभवांना मूर्तरूप दिले. दलिताचे जीणे चित्रीत केले.

कवी वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, ज. वि. पवार सारखे कवी ग्रामीण भागात जन्मले, तेथेच वाढले. येथील दैन्य, दु:ख, दारिद्र्य, अस्पृश्यतेबद्दलचा संताप कवितेतून व्यक्त केला. प्रल्हाद चेंदवणकर म्हणतात,

*"तुमच्या पावलाखाली*
*दडलेले आमचे श्वास*
*अजुनही घुसमटताहेत*
*गावाबाहेर उकिरड्यात*
*देणे तरी तुमचे किती*
*दाखवा आम्हाला हिसाब किताब*
*इतिहासाचे वारसदार*
*विचारतो आहोत, द्या जबाब!"*

असा विद्रोह अनेक पातळ्यांवरून प्रकट झाला. हा विद्रोह अस्पृश्यता, सांस्कृतिक मक्तेदारी विरूद्ध आहे.

